# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

**YEAR : 39)** **15th November 2014 (No. of Pages 16 )** **( No : 14**


MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

# दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या ठरावान्वये सुरू करण्यात आलेले आंदोलन ठामपणे सुरु राहील

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला ठराव क्रमांक : एक

**(१)** विद्यापीठीय परीक्षांच्या कामाशी असहकार केला म्हणून महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांचा दोन महिन्यांचा पगार थांबवून ठेवण्याची तत्कालीन उच्चशिक्षण मंत्र्यांच्या आदेशावरून करण्यात आलेली कृती ही अत्यंत द्वेष भावनेचे प्रतिनिधित्व करणारी कृती होय. कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता, ज्यांचा पगार आपण थांबवितो त्यांचे म्हणणे ऐकून न घेता, कायद्याने किंवा नियमाने कोणताही अधिकार दिलेला नसतांना दोन महिन्यांचा पगार थांबवून धरण्याचे आदेश निर्गमित करण्याचे तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांचे कृत्य हे निःसंशय बेकायदेशीर होय. वस्तुतः परीक्षेशी कुणी असहकार केला असेल किंवा करीत असेल तर त्याबाबत 'कारणे दाखवा' नोटीस देण्याचे व कारवाई करण्याचे अधिकार कायद्याने विद्यापीठांना प्रदान केलेले आहेत. त्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीसेस अनेक विद्यापीठांनी काढल्याही होत्या. पण **मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी "आता महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने परीक्षेच्या कामावरील असहकार मागे घेतल्याचा व पूर्ण सहकार्य करण्याचा निर्णय न्यायालयातच सांगितल्याने सर्व विद्यापीठांनी कारणे दाखवा नोटीसेस मागे घ्याव्यात" असे आदेश दिलेत. त्याप्रमाणे सर्व विद्यापीठांनी केलेली कारवाई मागे घेण्याचे आदेश निर्गमित केलेत. सर्व शिक्षकांनी मनापासून परीक्षेच्या कामात सहकार्य केले. सर्वच विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल त्यामुळे तत्परतेने लागले. सर्व विद्यापीठांनी शिक्षकांच्या या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. मात्र तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी आपले आदेश मागे घेतले नाहीत.** हास्यास्पद बाब अशी की जवळजवळ निम्म्या शिक्षकांकडे परिक्षेचे कोणतेही काम सोपविण्यात आलेलेच नव्हते, तरीही तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांच्या त्या वरवंट्याखाली सर्वांनाच भरडण्यात आले. कारणे दाखवा नोटीस न देता केलेल्या कारवाईमध्ये यापेक्षा वेगळे काय होणार? या प्रश्नाबाबत **"संघटनेशी चर्चा करा" असे मा. न्यायालयाचे आदेश असतांना साधी चर्चा न करणे, "महासंघाने दाखल केलेल्या याचिकेवरील तुमचे म्हणणे १५ दिवसात दाखल करा" असा मा. उच्च न्यायालयाने दिनांक २० नोव्हेंबर २०१३ रोजी आदेश दिला असतांना तसे न करण्याचा स्वभावजन्य उद्धटपणा हा न्यायालयाचा अवमान करणारा आहे असेच कोणीही म्हणेल.**

**(२) नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबर २०१३ रोजी दिलेल्या आदेशाची पुढच्या बारा महिन्यात अजिबात अंमलबजावणी होत नाही ही गोष्ट महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत राज्याची प्रतिष्ठा वाढविणारी नाही.** याबाबतीत तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांच्या बरोबरच नोकरशाहीने सुद्धा आपले कर्तव्य पार पाडण्यात अक्षम्य कुचराई केली असे स्पष्टपणे दिसून येते. आता तर मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबर २०१३ रोजी दिलेला अंतरिम आदेश आपल्या अधिकारात औरंगाबादच्या सहसंचालकांनी पूनर्रचित केलेला आहे. केंद्रशासनाच्या शासननिर्णयाप्रमाणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परिपत्रकान्वये, महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयान्वये, विद्यापीठांच्या परिनियमान्वये आखून दिलेल्या Career Advancement Scheme ची औरंगाबादच्या सहसंचालकांनी (या सर्वांचे अधिकार एकत्रितरित्या वापरून) पूनर्रआखणी केलेली आहे. नागपूरच्या सहसंचालकांनी या सर्वांवर ताण करून त्यांना अधिकार नसतांना Career Advancement Scheme च्या "निर्गुण निराकार" स्वरूपाचे दर्शन घडविलेले आहे. सारांश काय? तर या दोनही सहसंचालकांनी **आपल्याला असलेल्या सत्तेचा वापर करण्याच्या धुंदीमध्ये आपल्याला नसलेल्या सत्तेचा वापर करण्याची अंदाधुंदी करून राज्यभर उच्च शिक्षण क्षेत्रात फार मोठी अनागोंदी निर्माण केलेली आहे.** असे करतांना मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर तयार करण्यात आलेले विद्यापीठांचे परिनियमसुद्धा त्यांनी पायदळी तुडविले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या गंभीर न्यायालयीन प्रकरणामध्ये औरंगाबाद व नागपूरचे दोन सहसंचालक हे वेगवेगळी भूमिका घेतात ही अत्यंत लाजिरवाणी बाब असून त्यामुळे महाराष्ट्राची फार मोठी अप्रतिष्ठा होते हेही त्यांच्या लक्षात येत नाही हे दुर्दैव होय.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीपोटी ८० टक्के रक्कम म्हणजे अंदाजे १५०० ते १७०० कोटी रूपये केंद्र शासन राज्य शासनाला देणार आहे. **"ही थकबाकी पूर्णपणे प्रथम राज्य शासनाने अदा करावी नंतरच त्या रकमेचा परतावा केंद्र शासनाकडून राज्यशासनाला देण्यात येईल."** असा केंद्र शासनाचा शासननिर्णय आहे. बहुसंख्य शिक्षकांना ही थकबाकी देण्यात आली असून त्यापोटी जवळजवळ १५०० कोटी रूपये राज्यशासनाने खर्च केलेले आहेत. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीतसुद्धा ८० टक्के रक्कम केंद्र शासन देणार आहे. केंद्र शासनाने याबाबत ३१ डिसेंबर २००८ रोजी जो त्यांचा शासननिर्णय राज्य शासनाकडे पाठविलेला आहे, त्याच्या परिच्छेद ८ (e) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे.:-

> केंद्रशासनाकडील महाराष्ट्र राज्याचे पंधराशे कोटी रूपये बुडाले तरी चालतील पण या शिक्षकांची थकबाकी आम्ही देणारच नाही, असा क्रुर व असामान्य विचार ज्या राज्यकर्त्यांनी केला त्यांनी राज्याचे कोणते 'आर्थिक हित' डोळ्यासमोर ठेवले होते? हे सामान्य बुद्धीला समजण्यापलीकडचे आहे.
>
> *(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या २ नोव्हेंबर २०१४ च्या ठराव क्रमांक एकचा परिच्छेद २ पहा)*

"(e) Financial assistance from the Central Government shall be restricted to revision of pay scales in respect of only those posts which were in existence and had been filled up as on 1.01.2006. "

"या शिक्षकांना तुम्ही Career Advancement Scheme नाकारू शकत नाही. व्याजासकट त्यांना थकबाकी अदा करा" हा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय होऊन १५ महिने झालेत. "वेतनश्रेणीच्या प्रयोजनार्थ यांना Career Advancement Scheme चे लाभ देण्यात यावेत" असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होऊन १२ महिने झालेत. पण याबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही. **केंद्रशासनाकडील महाराष्ट्र राज्याचे पंधराशे कोटी रूपये बुडाले तरी चालतील पण या शिक्षकांची थकबाकी आम्ही देणारच नाही, असा क्रुर व असामान्य विचार ज्या राज्यकर्त्यांनी केला त्यांनी राज्याचे कोणते 'आर्थिक हित' डोळ्यासमोर ठेवले होते? हे सामान्य बुद्धीला समजण्यापलीकडचे आहे.**

**(३)** आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतनव्यवस्था लागू करण्याच्या प्रश्नाची स्थिती अशीच आहे. समाजकार्य महाविद्यालयातील "**शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय**" मंत्रिमंडळाने ८ जुलै १९९८ च्या बैठकीत घेतला होता. राज्यशासनाचा हा निर्णय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारा आहे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाने १८ जानेवारी २००० रोजी रद्द (SET ASIDE) ठरविला होता, तर राज्य मंत्रिमंडळाने ११ जुलै २००१ रोजीच्या बैठकीत पुन्हा "**या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला**" हे एक अत्यंत लांछनास्पद असे घटनाबाह्य वर्तन होते. मा. उच्च न्यायालयाने आता पुन्हा दिनांक १० जून २०१३ रोजी आयुर्वेद महाविद्यालये व समाजकार्य महाविद्यालयांच्या बाबतीत दिलेल्या निर्णयात "In democratic set up, no State can refuse to remove such discrimination. Since the injustice of hostile discrimination continues even today and judgments holding the field have not been implemented in letter and spirit" असे निरीक्षण नोंदविले व पुढील प्रमाणे आदेश दिले. :- "The monthly pension due to them from 1.1.2014 shall be released regularly along with others. Any default or delay in payment after stipulated period shall attract interest as per prevailing policy of the State Government." शासनाने लगेच सर्वोच्च न्यायालयात विशेष अपिलाची परवानगी मागण्यासाठी याचिका दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी '**डिसमिस**' केली. असे झाल्यावर सुद्धा आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षकांना निवृत्ती वेतन व्यवस्था लागू करण्याच्या १० जुन २०१३ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणारे शासननिर्णय १७-१८ महिन्याचा कालखंड लोटून गेला तरी निर्गमित झालेले नाहीत.

**(४)** निरनिराळ्या बाबतीत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या ३० ते ४० निर्णयांचे व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचे राज्यशासनाने पालन केलेले नाही. या बाबतचे सर्व तपशील याठिकाणी पुन्हा नमूद करण्याची आवश्यकता नाही. दिनांक १ जुन २०१४ रोजीच्या व २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावामध्ये या बाबी तपशीलवारपणे नमूद केलेल्या आहेत. दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या महासंघाच्या ठरावातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता.:-

"सन २०१४ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा अंमल सुरु झाल्यादिवसापासून १ जून २०१४ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार **सुरु करण्यात आलेले आंदोलन तात्पूरते थांबविण्यात येत आहे.** मात्र असे करीत असतांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी व उच्च शिक्षणमंत्र्यांनी तसेच उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी एकूणच शिक्षकांशी जे विश्वासघाताचे वर्तन केले, लेखी दिलेले शब्द पाळले नाहीत याची तपशीलवार नोंद या ठरावाच्या **परिच्छेद दोन** मध्ये करण्यात आलेली असून शिक्षकांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या ३० ते ४० निर्णयांची अंमलबजावणी न करुन या शासनाने त्या निर्णयांची अवहेलना केलेली आहे. राज्य शासनाचे हे कृत्य सरळसरळ घटनाबाह्य असून त्याबाबतचे तपशील या ठरावाच्या **परिच्छेद तीन** मध्ये नमूद केलेले आहे. आचारसंहितेचा कालखंड संपल्यानंतर आंदोलनाचे स्वरूप कसे राहील याबाबतचे तपशील या ठरावाच्या **परिच्छेद चार** मध्ये दिलेले आहेत."

**(५)** दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजी या महासंघांच्या कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या ठरावातील शेवटचा परिच्छेद चार पुढीलप्रमाणे होता.:-

"मुख्यमंत्री, उच्चशिक्षण मंत्री यांनी वारंवार दिलेली लेखी अभिवचने पाळली जात नाहीत ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. मा. उच्च न्यायालयाच्या ३० ते ४० न्यायनिर्णयांची तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांची अंमलबजावणी केली जात नाही ही अत्यंत अशोभनीय बाब आहे. राज्यशासनाच्या **राज्यकारभार करण्याच्या उपरोक्त पद्धतीचा तीव्र निषेध म्हणून आचारसंहितेचा अंमल संपल्यानंतर १ जून २०१४ च्या ठरावान्वये सुरू केलेले व आचारसंहितेच्या काळात तहकूब ठेवण्यात आलेले आंदोलन पुन्हा सुरू करण्यात येईल.** इतकेच नव्हे तर हे आंदोलन तीव्र करण्यासाठी पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

(१) सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत विद्यापीठस्तरीय संघटनामार्फत **मा. कुलगुरू कार्यालयासमोर धरणे आंदोलन** आयोजित करण्यात येईल.

(२) सोमवार दिनांक १ डिसेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत आझाद मैदान मुंबई येथे **राज्यस्तरीय धरणे आंदोलन** केले जाईल.

(३) सोमवार दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी राज्यभर **सामूहिक रजा** कार्यक्रम आयोजित केला जाईल.

(४) सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०१४ पासून '**बेमुदत कामबंद**

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH : NAGPUR

**WRIT PETITION NO. 2216 OF 2014**

(Dr. Abhay Bhausaheb Solunke vs. State of Maharashtra thr. Principal, Secretary, Higher & Technical Education Department & Ors.) AND **WRIT PETITION NO. 1122 OF 2014** (Dr. Bhagwandas G. Suryawanshi & Ors. vs. State of Maharashtra thr. Principal, Secretary, Higher & Technical Education Department & Ors.)

**CORAM : B.P. DHARMADHIKARI & P.R. BORA, JJ.**
**NOVEMBER 07, 2014.**

Heard Shri A.I. Sheikh, learned counsel for the **petitioners,** Shri Kankale, learned AGP for the **Respondents** – State Government authorities, Shri Kulkarni, learned counsel for Gondwana University, Shri Ghurde, learned counsel for respondent No. 4 in Writ Petition No. 1122/2014 and Ms. Sandhya Maniyar, learned counsel for respondent No. 6 in Writ Petition No. 2216/2014.

The respective counsel appearing for the petitioners as also for the respondents do not dispute that the issue involved has been looked into by this Court on 30.01.2014 in Writ Petition No. 6473 of 2013.

In view of the joint statement, ***Rule***. Hearing expedited. Learned AGP waives notice on behalf of the respondents – Government authorities, Shri Kulkarni, learned counsel waives notice for Gondwana University, Shri Ghurde, learned counsel waives notice for respondent No. 4 in Writ Petition No. 1122/2014 and Ms. Sandhya Maniyar, learned counsel waives notice for respondent No. 6 in Writ Petition No. 2216/2014.

In the light of interim orders passed by the Hon'ble Apex Court, we also pass the similar orders as interim orders.

Following the UGC Notification/ Letter dated 04.11.2008, those teachers who have not passed NET/ SET Examination but who have completed six years of service as on that date, **should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purposes of payscales. The said exercise be completed within a period of six months.** The same shall be subject to further orders in the matters.

**JUDGE** **JUDGE**

( PR: (1-7) P121 B14 (8-16) P121 B14 (17) P151 B14 (18) P 184 B14 (19) P 190 B14)

**आंदोलन**' करण्याचे ठरविण्यात आले."

**(६)** दिनांक २४ ऑगस्ट २०१४ च्या ठरावान्वये निश्चित करण्यात आलेला **आंदोलनाचा उपरोक्त कार्यक्रम निर्धारपूर्वक पुढे चालविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.** असे करीत असतांना सातत्त्याने शिक्षकांचा द्वेष करणारे मुख्यमंत्री, उच्चशिक्षणमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ यांची महाराष्ट्रातील राजवट संपुष्टात आली व शासनामध्ये लोकांना दिलासा देणारा बदल झाला असून राज्यामध्ये नवीन मुख्यमंत्री, उच्चशिक्षणमंत्री व मंत्रीमंडळाने पदभार स्वीकारलेला आहे ही गोष्ट हे कार्यकारी मंडळ नजरेआड करू शकत नाही. म्हणूनच असाही निर्णय घेण्यात येत आहे की मा. मुख्यमंत्री व मा. उच्चशिक्षणमंत्री यांच्याकडे तातडीने चर्चेची मागणी करण्यात यावी व **चर्चेअंती निष्पन्न झालेले फलित लक्षात घेऊन आंदोलनाच्या कार्यक्रमाचा पूनर्विचार करण्यात येईल.**

**(७)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा हा ठराव मा. मुख्यमंत्री व मा. उच्चशिक्षण मंत्री यांना तातडीने सादर करण्यात यावा. मा. उच्चशिक्षण मंत्र्यांनी याबाबतीत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा करण्यासंदर्भात पुढाकार घ्यावा, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. "चर्चेसाठीचे मुद्दे" परिशिष्ट एक म्हणून सोबत जोडलेले आहेत.

**सहपत्र** : परिशिष्ट एक

**(प्रा. ए. टी. सानप)** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने*
*रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या*
*मुंबई येथील बैठकीत*
*संमत केलेला ठराव क्रमांक : एकचा परिच्छेद ७ पहा*

**परिशिष्ट एक :**

## चर्चेसाठी घ्यावयाचे मुद्दे

**(१)** सन १९९१ ते २००० या काळात विधिमयरित्या सेवेत आलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बावतीत १८ नोव्हेंबर २०१३ च्या **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे.**

**(२)** परीक्षेच्या कामाशी सहकार्य करण्याचे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आज न्यायालयातच मान्य केल्याने "विद्यापीठाने निर्गमित केलेल्या कारणे दाखवा नोटीसा मागे घेण्यात याव्या." असे आदेश मा. उच्च न्यायालयाने १० मे २०१३ रोजी दिले असतांना व कायद्याने कारवाई करण्याचा अधिकार विद्यापीठांना असल्यामुळे त्यांनी कारणे दाखवा नोटीसा मागे घेतल्या. शिक्षकांनी परीक्षेच्या कामाशी सहकार्य केले. परीक्षांचे निकाल तत्परतेने लागले, असे असतांना तत्कालीन उच्चशिक्षण मंत्र्यांनी दोन महिन्याचा पगार अकारणच थांबवून ठेवण्याचे काढलेले **बेकायदेशीर आदेश परीक्षांचे निकाल लागून एक वर्ष पूर्ण झाले तरी मागे न घेणे.**

**(३)** "३१ जुलै २०१३ पावेतो सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यात येईल." असे मा. उच्च न्यायालयात शासनाने कबूल केले. अवमान याचिकांची प्रक्रिया सुरू झाल्यावर बहुसंख्य शिक्षकांची थकबाकी अदा करण्यात आली असली तरी अनेक शिक्षकांना ही थकबाकी अजूनही अदा करण्यात आलेली नाही. **(A)** सन २००६ नंतर सेवेत आलेल्या बहुतांशी शिक्षकांना ही थकबाकी अजूनही देण्यात आलेली नाही. **(B)** बहुतांशी अंशकालीन शिक्षकांना ही थकबाकी अजूनही अदा करण्यात आलेली नाही. **(C)** नागपूरातील एक समाजकार्य महाविद्यालय सोडले तर इतर सर्व समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना ही थकबाकी अजूनही अदा करण्यात आलेली नाही.

**(४)** कुंठित वेतनवाढीच्या संदर्भात 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या एक 'गृहउद्योग' उच्चशिक्षण विभागात गेले ३-४ वर्षे राबविल्या जात आहे. सन २०११, २०१२, २०१३ व २०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांचे एका मागून एक ६ निर्णय आलेत. पुन्हा पुन्हा कोर्ट कचेरी करावी लागू नये म्हणून **"आमच्या आदेशाचे पालन करण्यासाठी धोरणात्मक शासननिर्णय काढा"** असा मा. उच्च न्यायालयाने १ ऑक्टोंबर २०१३ रोजी निर्णय दिल्यानंतर सुद्धा कोणतीही कार्यवाही झाली नाही.

**(५)** सन १९९६ नंतर निवडश्रेणीमध्ये गेलेल्या व त्या श्रेणीत पाच वर्षाची सेवा ज्यांनी पूर्ण केलेली आहे, अशा शिक्षकांची **१४९४० च्या टप्प्यावर वेतननिश्चिती करण्याचा लाभ न देण्याबाबत** राज्य शासनाने स्वीकारलेले कमालीच्या आकसाचे धोरण मा. उच्च न्यायालयातील अनेक निर्णयांनी निष्प्रभावी ठरविले असतांना **त्याबाबतचा धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित न होणे.** शासनाची पुनर्विलोकन याचिका दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने **डिसमिस** केली. धोरणात्मक शासननिर्णय अजूनही निघालेला नाही.

**(६)** मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करून दिनांक २५ जुलै २०१३ रोजी एक शासन निर्णय काढून जी **व्यथा निवारक यंत्रणा** स्थापन केली ती पाहता राज्यशासनाने मा. उच्च न्यायालयाची एक प्रकारे थट्टाच करण्याचा घडलेला प्रकार.

**(७)** आयुर्वेद व समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना **सेवानिवृत्ती वेतन योजना.** मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयात निर्णय होऊन सुद्धा त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न होणे.

**(८)** सन २००६ पूर्वी ज्या शिक्षकांनी पी.एचडी. प्राप्त केली त्यांना त्यावेळच्या शासननिर्णयानुसार उत्तेजनार्थ वेतनवाढी दिल्या गेल्या. सन २००६ नंतर ज्या शिक्षकांनी पी.एचडी. पदवी प्राप्त केली त्यांना देण्यात आलेल्या उत्तेजनार्थ वेतनवाढीमुळे एकाच महाविद्यालयातील **सेवाज्येष्ठ शिक्षकांना त्याच महाविद्यालयातील सेवेत कनिष्ठ असलेल्या शिक्षकांपेक्षा कमी वेतन मिळण्याचे प्रकार** अनेक ठिकाणी घडून आले. दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक १०२८३ जो निर्णय दिला **त्याप्रमाणे धोरणात्मक निर्णय न निघाल्यामुळे** प्रत्येक शिक्षकाला न्यायालयात जावे लागत आहे. डॉ. श्रीपाद सोनेगावकर यांनी सन २०१३ मध्येच याबाबतची याचिका मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल केलेली होती. (याचिका क्रमांक ४६२८ ऑफ २०१३) त्या याचिकेचा निर्णय अर्जदाराच्या बाजूने लागला. जे.एम. पटेल महाविद्यालयातील ८ प्राध्यापकांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर एक याचिका (W.P. No. 953 of 2014) दाखल केली होती. या याचिकेचा निकाल दि. ८ जुलै २०१४ रोजी या शिक्षकांच्या बाजूने लागला. अनेक याचिका दाखल झाल्या आहेत व होत आहेत.

**(९)** काही शिक्षकांना ५ लक्ष रूपये व काही शिक्षकांना ७ लक्ष रूपये **ग्रॅच्युईटी अदा करण्याचा राज्य शासनाचा भेदभाव** करणारा शासन निर्णय सर्वोच्च न्यायालयात रद्द झाला तरी अनुषंगिक कार्यवाही मात्र झालेली नाही. उच्चशिक्षण सचिवांनी सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त क्षमायाचना केल्यावर दिनांक ७ जूलै २०१४ रोजी याबाबतचा शासननिर्णय निर्गमित झाला हे खरे असले तरी सेवानिवृत्तीवेतनात तदनुषंगिक वाढ करण्याच्या मा. उच्चन्यायालयाच्या निर्णयाची (८२५६/२०१३) अंमलबजावणी करणारा शासननिर्णय निर्गमित झालेला नाही.

*****

**(MFUCTO)**

**Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील

# मा. कुलगुरू कार्यालयासमोर धरणे आंदोलन

सोमवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०१४
वेळ दुपारी १२ ते ४
यावेळेत आयोजित केलेले आहे.

**प्रा. प्रवीण रघुवंशी** (अध्यक्ष) — NUTA — **डॉ. अनिल ढगे** (सचिव)

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला*
*ठराव क्रमांक : दोन*

# मा. सर्वोच्च न्यायालयासमोर निदेशार्थ अर्जाच्या संदर्भात सादर करावयाची महत्त्वपूर्ण कागदपत्रे या संदर्भात

**१.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत वेगवेगळे सहसंचालक वेगवेगळी भूमिका घेत आहेत. औरंगाबादच्या सहसंचालकांनी "**या प्रत्येक शिक्षकांची सेवा विद्यापीठ अनुदान आयोगाने नेटसेट मुक्तता प्रदान करणारे पत्र ज्या तारखेला पाठविले त्या तारखेपासून 'कॅस'** (Career Advancement Scheme) **साठी मोजण्यात यावी**" अशा प्रकारचा घेतलेला निर्णय अत्यंत बेकायदेशीर असून तो मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाच्या सरळ सरळ विरोधात जाणारा असून खुद्द राज्य शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयांच्या व त्या शासन निर्णयाप्रमाणे मा. राज्यपालांच्या संमतीने अस्तित्वात आलेल्या विद्यापीठीय परिनियमांचा **भंग करणारा आहे.**

**२.** असे दिसून येते की औरंगाबादच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी आपल्या दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ च्या पत्रान्वये हा निर्णय काही महाविद्यालयांना कळविला. "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ नोव्हेंबर २०१३ च्या निर्णयाप्रमाणे 'कॅस' (Career Advancement Scheme) लागू करतांना प्रत्येक शिक्षकांची सेवा विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्ततेबाबत पत्र पाठविल्याच्या दिनांकापासून (४ नोव्हेंबर २००८ पासून) धरली जाईल. असे त्या पत्रान्वये त्यांनी कळविले. दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये जो निर्णय दिला त्यामध्ये २१ नेट-सेट मुक्त शिक्षक हे याचिकाकर्ते होते. (यापुढे 'मूळ २१ याचिकाकर्ते' असा उल्लेख) या प्रकरणामध्येच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी अंतरिम आदेश दिला. तो पुढीलप्रमाणेः- "*We are of the view that following the UGC Notification/ Letter dated 4-11-2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of* ***career advancement scheme*** *only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice.*" वस्तुतः मूळ अंतरिम आदेश अत्यंत स्पष्ट असूनही **औरंगाबादच्या सहसंचालकांनी घेतलेली नवी भूमिका ही संपूर्णपणे बेकायदेशीरपणाची असून त्या भूमिकेला सर्व स्तरावरून विरोध करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

**३.** या अत्यंत बेकायदेशीर नव्या भूमिकेच्या विरोधात मूळ याचिकाकर्त्या २१ शिक्षकांनी मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत निदेश द्यावेत म्हणून मा.सर्वोच्च न्यायालयात एक निदेशार्थ अर्ज (Application for Directions) ४ जुलै २०१४ च्या दरम्यान दाखल केलेला आहे. या अर्जामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ च्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी करण्याचे राज्यशासनास निदेश द्यावेत अशी विनंती करण्यात आली असून पुढे अशीही विनंती करण्यात आली आहे की, राज्यशासनाला पुढीलप्रमाणे आणखी निदेश द्यावेत.:- "(b) direct the Appellants/State Government to grant benefit of Career Advancement Scheme as recommended by the Respondent no. 22/ University i.e. from the date of their initial appointments." सदरहू मूळ २१ याचिकाकर्त्यांनी उपरोक्त निदेशार्थ अर्ज (Application for Directions) दाखल करून एक उत्तम व योग्य पाऊल उचलले असून त्यांनी मिळविलेला अंतरिम आदेश जसा एक पथदर्शक निर्णय ठरला तसाच या निदेशार्थ अर्जावरील मिळणारा निर्णयसुद्धा या प्रकरणी पथदर्शक निर्णय ठरेल अशी या सभेला खात्री वाटते. **या कामी या मूळ २१ याचिकाकर्त्यांना ही सभा मनापासून शुभेच्छा व्यक्त करीत आहे.**

**४.** सदरहू २१ मूळ याचिकाकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर केलेल्या निदेशार्थ अर्जामध्ये (Application for Directions) केलेली विनंती (prayer) अत्यंत योग्य असून सर्व संबंधितांनी व संघटनांनी या कामी त्यांना यश मिळेल अशीच भूमिका घेतली पाहिजे. या अर्जामध्ये (Application for Directions) समाविष्ट असलेले २५ परिच्छेद तज्ञ विधिज्ञांच्या अत्यंत सूक्ष्म विधी ज्ञानावर आधारीत असून त्याचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर त्याशिवाय काही महत्त्वाचे मुद्दे (आधारभूत कागदपत्रासह) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे असे या सभेला वाटते. सदरहू प्रकरणी मूळ २१ याचिकाकर्त्यांच्या वतीने जो अर्ज (Application for Directions) सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आला आहे. त्यातील विनंतीला मजबूत बळ देणारे काही महत्त्वाचे मुद्दे (आधारभूत कागदपत्रासह) सोबत **सहपत्र : एक** मध्ये समाविष्ट केलेले आहेत व तो अर्ज **सहपत्र : दोन** म्हणून सोबत दिलेला आहे.

---

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेला आंदोलनाच्या ठरावानुसार*

# राज्यस्तरीय धरणे आंदोलन

सोमवार, दिनांक ०१ डिसेंबर २०१४

**आझाद मैदान, मुंबई**

वेळ दुपारी १२ ते ४ यावेळेत आयोजित केलेले आहे.

**प्रा. ए. टी. सानप** *(अध्यक्ष)* **डॉ. ताप्ती मुखोपाध्याय** *(सचिव)*

**५.** सदरहू **सहपत्र : एक** मध्ये नमूद करण्यात आलेले महत्त्वाचे मुद्दे (आधारभूत कागदपत्रासह) शक्यतोवर उक्त मूळ २१ याचिकाकर्त्यांच्या मार्फतच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देण्यासाठी प्रयत्न करावा. असे करतांना त्यांच्या विनंती अर्जावर निर्णय होण्यास कोणताही विलंब होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. तथापि तांत्रिक कारणावरून त्यांच्यामार्फत हे मुद्दे मांडणे शक्य होणार नसेल तर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेच्या माध्यमातून हे मुद्दे मा. सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करण्याची कारवाई पार पाडली जावी असे ठरविण्यात येत आहे.

**६.** (A) १७ सप्टेंबर २०१४ रोजीची अवमान याचिकेची नोटीस (**सहपत्र : चार**) मिळाल्यानंतर सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०१४ रोजी एक परिपत्रक काढून निरनिराळ्या महाविद्यालयांना "**संबंधित याचिकाकर्ता यांच्या बाबतीत विद्यापीठाद्वारे गठीत करण्यात आलेली निवड समितीची शिफारस व वरील मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालयाचे आदेश यामध्ये तफावत दिसून येत असून त्यानुसार समितीच्या शिफारशीमध्ये सुधारणा होणे अभिप्रेत आहे.**" असे कळविले आहे. त्याच पत्रात त्यांनी महाविद्यालयांना "**कॅसचे लाभ अदा करण्याकरीता यु.जी.सी/ विद्यापीठाचे/शासनाच्या प्रचलित नियमानुसार विशिष्ट कार्यपद्धती व सुनिश्चित नियमावली चे पालन करून या कार्यालयास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.**" असेही कळविले आहे. पालन करावयाची कोणती सुनिश्चित नियमावली त्यांना अभिप्रेत आहे हे त्यांनी कोठेही स्पष्ट केलेले नाही. वस्तुतः पहिल्या दिवसापासून अशा प्रत्येक शिक्षकाची सेवा धरून 'कॅस' (Career Advancement Scheme) चे लाभ देणारी कृती ही विद्यापीठ अनुदान आयोगाचे निदेश तसेच नागपूर विद्यापीठाचे परिनियम व शासननिर्णय यांना धरूनच केलेली आहे. तसेच ती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी पूर्णपणे सुसंगत आहे व त्यामुळे सहसंचालकांच्या या भूमिकेमुळे पहिल्या दिवसापासून सेवा धरून लाभ देण्याच्या नागपूर विद्यापीठाच्या भूमिकेमध्ये बदल करण्याची कोणतीही आवश्यकता नाही हे स्पष्टपणे सहसंचालकांना कळवावे. त्यांना हेही कळवावे की मा. राज्यपालांच्या संमतीने करण्यात आलेल्या नागपूर विद्यापीठाच्या परिनियम ५३ अन्वये हे सर्व शिक्षक नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून सेवेत 'कन्फर्म' झालेले आहेत. **नागपूर विद्यापीठाच्या संबंधित प्राधिकरणांनी आपल्या मूळ भूमिकेशी सुसंगत असे ठराव करून सहसंचालकांनी स्वीकारलेली बेकायदेशीर भूमिका ठामपणे फेटाळून लावावी, अशी विनंती करण्यात येत आहे.**

(B) नागपूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक कोणत्या "सुनिश्चित नियमावली" च्या आधारे काम करीत आहेत ती नियमावली त्यांनी जाहीर करावी. त्यांचे हे अपकृत्य संपूर्णपणे बेकायदेशीरपणाचे आहे हे स्पष्ट करणारी महत्त्वपूर्ण कागदपत्रे **सहपत्र : एक** मध्ये समाविष्ट आहेत. त्याचा त्यांनी काळजीपूर्वक अभ्यास करावा अशी त्यांना विनंती आहे. तसे त्यांनी केल्यास त्यापेक्षा वेगळी अशी कोणतीही "सुनिश्चित नियमावली" अस्तित्वात नाही हे त्यांच्या लक्षात येईल. खुद्द नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये घडलेला कायदेशीर घटनाक्रम नमूद असलेले महत्त्वपूर्ण मुद्दे **सहपत्र : एक** मध्ये समाविष्ट केलेले आहेत. **त्याचा सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर यांनी विचार करावा व उचललेले व चुकीचे व बेकायदेशीर पाऊल मागे घ्यावे.**

(C) नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत नागपूर विद्यापीठाच्या मा. कुलसचिवांनी दिनांक १७ डिसेंबर २००२ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाला तपशीलवार पत्र पाठवून जी भूमिका कळविलेली आहे त्यामध्ये याबाबतच्या सुनिश्चित नियमावलीचे तपशीलवार विवेचन केलेले आहे. नागपूर विद्यापीठाची ती भूमिका कायदे व परिनियम यावर आधारित असून त्यामध्ये बदल करण्यासाठी आज कोणतेही नवीन कारण पुढे आलेले नाही हे **एक व शिवाय दुसरे असे की** दिनांक २९ मार्च २०११ रोजी याच शिक्षकांच्या प्रकरणात राज्यशासनाच्या वतीने आपण नागपूर खंडपीठासमोर एक शपथपत्र दाखल केले होते, त्याचा व त्यातील मजकूराचा सहसंचालकांना विसर पडावा हे अत्यंत लज्जास्पद होय. **आणखी तिसरे असे की** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ८ सप्टेंबर १९९४ च्या निर्णयातील (AIR 1995 Supreme Court 336) परिच्छेद २४ नुसार या सर्व शिक्षकांच्या सेवा कॅसकरिता (Career Advancement Scheme) नेमणूकीच्या दिनांकापासून न धरण्याची कृती ही संपूर्णपणे बेकायदेशीरपणाची आहे याची जाणीव असल्यामुळेच ते इतरांना "**प्रस्ताव दुरूस्त करून आणा**" असे सांगत आहेत कारण असे बेकायदेशीर कार्य करण्याचे पाप आपल्या हातून घडू नये याची काळजी त्याद्वारे नागपूरचे उच्चशिक्षण सहसंचालक घेत आहेत, याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. "**विद्यापीठानेच बेकायदेशीर कृत्य केले त्याला मी काय करणार?**" "**शिक्षकांनी व प्राचार्यांनीच तसा प्रस्ताव आणला, त्याला मी काय करणार?**" असे उद्या म्हणायला ते मोकळे राहतील. पहिल्या दिवसापासून सेवा धरून हे प्रस्ताव विद्यापीठांनी, मा. प्राचार्यांनी व शिक्षकांनी सादर केलेले आहेत. त्यामध्ये कोणताही बदल आपल्या पातळीवर करू नये. त्यामध्ये **त्यांच्या अधिकारात सहसंचालकांना काय बदल करावयाचा असेल तो त्यांनी करावा व त्या अपकृत्यांची जबाबदारीही त्यांचीच असेल अशी स्पष्ट भूमिका घेण्यात यावी अशी विनंती हे सभागृह सर्व संबंधितांना करीत आहे.**

**७.** मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबर २०१३ रोजी दिलेला अंतरिम आदेश आपल्या अधिकारात औरंगाबादच्या सहसंचालकांनी पूनर्रचित केलेला आहे. केंद्रशासनाच्या शासननिर्णयाप्रमाणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परिपत्रकान्वये, महाराष्ट्र शासनाच्या शासननिर्णयान्वये, विद्यापीठाच्या परिनियमान्वये आखून दिलेल्या Career Advancement Scheme ची औरंगाबादच्या सहसंचालकांनी (या सर्वांचे अधिकार एकत्रितरित्या वापरून) पूनर्रआखणी केलेली आहे. नागपूरच्या सहसंचालकांनी या सर्वांवर ताण करून त्यांना अधिकार नसतांना Career Advancement Scheme च्या "निर्गुण निराकार" स्वरूपाचे दर्शन घडविलेले आहे. सारांश काय? तर या दोनही सहसंचालकांनी **आपल्याला असलेल्या सत्तेचा वापर करण्याच्या धुंदीमध्ये आपल्याला नसलेल्या सत्तेचा वापर करण्याची अंदाधुंदी करून राज्यभर उच्च शिक्षण क्षेत्रात फार मोठी अनागोंदी निर्माण केलेली आहे.** असे करतांना मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर तयार करण्यात आलेले विद्यापीठांचे परिनियमसुद्धा त्यांनी पायदळी तुडविले आहेत. **या सर्व बाबी मा. राज्यपालांच्या तसेच मा. मुख्यमंत्र्यांच्या व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लक्षात आणून देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

*****

**सहपत्रे** : सन २०१४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १९४ वर सहपत्र एक, पृष्ठ १८७ वर सहपत्र दोन, पृष्ठ १८१ वर सहपत्र तीन व पृष्ठ १८२ वर सहपत्र चार प्रसृत करण्यात आलेले आहे.

*****

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

**Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेला आंदोलनाच्या ठरावानुसार*

# राज्यस्तरीय सामूहिक रजा कार्यक्रम

सोमवार, दिनांक ०८ डिसेंबर २०१४

**प्रा. ए. टी. सानप** *(अध्यक्ष)* **डॉ. ताप्ती मुखोपाध्याय** *(सचिव)*

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत केलेला ठराव क्रमांक : दोनचा परिच्छेद ४ पहा*

*सहपत्र : एक*

# मूळ २१ याचिकाकर्त्यांच्या वतीने जो अर्ज (Application for Directions) सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आला आहे. त्यातील विनंतीला मजबूत बळ देणारे काही महत्त्वाचे मुद्दे (आधारभूत कागदपत्रासह) समाविष्ट असलेले सहपत्र.

मूळ २१ याचिकाकर्त्यांच्या वतीने जो अर्ज (Application for Directions) सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आला आहे. त्यातील विनंतीला मजबूत बळ देणारे काही महत्वाचे मुद्दे (आधारभूत कागदपत्रासह) पुढीलप्रमाणेः-

**(१)** विद्यापीठ अनुदान आयोगाने एकदा 'एक्झमशन दिले' असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ.) : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे.

" 24.... **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized."** थोडक्यात सांगावयाचे तर विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट-सेट मुक्ततेबाबत एकदा मान्यता मिळाली की या शिक्षकांच्या सेवा तर नियमित होतीलच पण **त्यांच्या वेतनावरील केंद्राचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुज्ञेय अनुदान सुद्धा त्यांना मिळेल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. सन १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सर्व बाजूंनी जोरदार युक्तीवाद झालेत व त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने देशभरासाठी १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरूप निश्चित करून दिले. भारतात आज या विषयावरील कायद्याचा अर्थ सांगणारा हा अंतिम शब्द आहे.**

**(२)** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरूप स्पष्ट करणारा मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ सप्टेबर १९९४ रोजी सिव्हील अपिल नं. १८१९ ऑफ १९९४ मध्ये जो उपरोक्त अंतिम निर्णय दिला आहे, त्या निर्णयाच्या परिच्छेद २१ मध्ये पुढील महत्त्वाचा निर्णय आहे.:-

"**recommendatory :** The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character. **application prospective :** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective."

**(३)** मा. सर्वोच्च न्यायालयाचाच तो निर्णय असल्यामुळे १९९१ चे रेग्युलेशन हे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही. ही गोष्ट महाराष्ट्र शासनाने शासननिर्णय काढून मान्य केलेली आहे. २७ जून २०१३ च्या शासननिर्णयातील याबाबतचा परिच्छेद १४ शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :- "१४. प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १९.०९.१९९१ ची अधिसूचना राज्यात दि. २३.१०.१९९२ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली, त्यामुळे **सदर शासन निर्णयातील तरतुदी दिनांक १९.०९.१९९१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही.** सबब दि. २३.१०.१९९२ पूर्वी नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १९.०९.१९९१ च्या अधिसूचनेतील अर्हता लागू राहणार नाही." **पुढच्या ३५ दिवसात २३.१०.१९९२ चा शासननिर्णय २७ नोव्हेंबर १९९२ च्या शासननिर्णयान्वये रद्द झाला होता ही वस्तुस्थिती मा. सर्वोच्च न्यायालयासमोर ठेवल्यावर एक म्हणजे १९.९.१९९१ ते २३.१०.१९९२ या काळात नेमलेले शिक्षक व दुसरे म्हणजे २३.१०.१९९२ ते ३ एप्रिल २००० या काळात नेमलेले शिक्षक यांच्या विधिमय स्थितीमध्ये कोणताच फरक राहत नाही.**

**(४) (A)** दिनांक २७ जून २०१३ रोजी नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत राज्यशासनाने जो शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्या शासननिर्णयातील परिच्छेद १५ पुढीलप्रमाणे आहे.:-

"१५. दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांनी त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता (नेट/सेट/पीएच.डी/एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून **त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**"

**(B)** ज्या चार अटी टाकल्या आहे त्याबाबत कोणताही वाद नाही. **"त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे."** या वाक्यावरून खरा वाद निर्माण झालेला आहे. या वाक्याचे दोन अर्थ संभवतात.

**(१) पहिला अर्थ पुढीलप्रमाणे:-** प्रत्येक कायद्यांमध्ये, नियमामध्ये, शासननिर्णयामध्ये तो कायदा, नियम किंवा निर्णय केव्हापासून अमलात येईल. याबाबतची वाक्संहिता अंतर्भूत असते. "This act shall come into force with effect from..." अशा अर्थाची ती वाक्यरचना असते. या शासननिर्णयाच्या परिच्छेद १५ मधील या वाक्यरचनेचा अर्थ **हा शासननिर्णय केव्हा पासून अंमलात येईल एवढेच समजण्यापूरता धरावा.** असा हा पहिला अर्थ आहे.

**(२) दुसरा अर्थ पुढीलप्रमाणे:-** त्या वाक्याचा दुसरा अर्थ "सर्व प्रयोजनासाठी ती सेवा" शासननिर्णय निघाल्याच्या दिवसापासून धरली जाईल असा होतो. चर्चेच्या वेळी संघटनेला शासनातर्फे तो तसाच सांगण्यात आला होता व त्यामुळे त्यावेळी व शासन निर्णय निर्गमित झाल्यावर सर्वांनी तो तसाच गृहीत धरला आहे. प्रत्यायुक्त विधीविधान किंवा उपविधान (delegated legislation) हे असे पूर्वलक्षी प्रभावाने कोणाच्या सेवा उध्वस्त करू शकत नाही. ते नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या विरोधात आहे. **"भूत काळातील ज्या सेवा मोजल्या जाणारच नाहीत त्या "त्यांच्या सेवा" नियमित करण्याचा आव आणणे किंवा सर्व प्रयोजनार्थ धरण्यास मान्यता देणे हा एक नेत्रदीपक चमत्कार होय"** एवढेच म्हणता येईल. त्यामुळे दुसरा अर्थ कायद्यापुढे मूळीच टिकत नाही, असे अनेक विधिज्ञांचे मत आहे.

**(C)** मूळ याचिकाकर्ते २१ शिक्षक विरूद्ध राज्यशासन या प्रकरणात दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी (W.P. No. 11477 of 2010) दिलेल्या निर्णयात मा. औरंगाबाद खंडपीठाने दुसऱ्या अर्थाला कवडी इतकीही किंमत दिलेली नाही. त्या निर्णयातील परिच्छेद १० पुढीलप्रमाणे:-

"(10) On perusal of the Government Resolution dated 27th June, 2013, it is evident that the services rendered by the teachers in senior colleges, who do not possess NET/SET qualification **are liable to be considered for all purposes** if :

[a] Their appointment is made on regular basis by observing recruitment procedure.

[b] The concerned teacher possesses all other qualifications excluding NET / SET.

[c] The University has approved the qualifications other than NET / SET.

[d] The proposal for grant of exemption of deficiency of NET /SET is furnished to the University and competent committee is to take decision in that regard."

**(D)** वकील मग तो कोणत्याही पक्षाचा असो न्यायक्षेत्रामध्ये अशा नेत्रदीपक चमत्काराची कल्पना करू शकत नाही. म्हणूनच शासकीय अधिवक्त्यांनी त्याबाबतची स्पष्ट कबूली मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर दिनांक १० मे २०१३ रोजी दिली होती व ती त्यादिवशीच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात परिच्छेद ४ मध्ये पुढील शब्दात नमूद आहेः-

"(4) As regards the above submission, Mr. Saluja states that

the **State Government will issue G.R. within two weeks from today for granting exemption from NET/SET to those teachers who were appointed between 19 September 1991 and 3 April 2000** after following the regular procedure."

त्याच निर्णयात पुढे परिच्छेद ५ मध्ये पुढीलप्रमाणे शासनाच्या वतीने मान्य करण्यात आले होते.:-

"**(5)** Mr. Saluja further states that though regularization will be made with effect from the date of the G.R., **the Government and the Universities will protect the pay and the pay fixation including increments already paid to the teachers and therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned. Similarly there will be no recovery of other benefits."**

या सर्व शिक्षकांना प्रत्येक वर्षाची सेवा धरून वार्षिक वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत. त्या कापणार नाही असे एकदा न्यायालयात मान्य केल्यावर ती सेवा इतर प्रयोजनासाठी न धरणे हा एक चमत्कारच होय.

**(E)** दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी औरंगाबाद खंडपीठाने (W.P. 5271 of 2013) या प्रकरणातसुद्धा पहिलाच अर्थ गृहीत धरलेला आहे असे दिसून येते. त्या निर्णयातील परिच्छेद १५ पुढीलप्रमाणे :-

"**15.** It appears that in Writ Petition (Lodging) No.1326/2012, **a statement was made on behalf of the State Government that Government Resolution would be issued exempting teachers, who were appointed after following prescribed procedure during the period from 19.09.1991 to 03.04.2000, and stating that a GR will be issued granting exemption from NET / SET to those teachers who were appointed during 1991 to 2000** and the Government and the Universities would protect the pay fixation, including increments already paid to the teachers and, therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned. It appears that **subsequently, Government Resolution dated 27.06.2013 has been issued from which it emerges that it has been decided that -**

1. Notification dated 19.09.1991 of the UGC has been adopted by the State Government under a Resolution dated 23.10.1992 and, as such, the stipulations in the notification dated 19.09.1991 would not be applicable to the lecturers appointed before 23.10.1992.

2. The lecturers, who are appointed during 23.10.1992 to 3.4.2000, who do not possess NET / SET / Ph.D. / M.Phil would be considered for all purposes, on fulfillment of the conditions that -

(a) Their appointments should be on regular basis.

(b) Their appointments should be made after following the prescribed procedure.

(c) The lecturers shall have all other qualifications except NET / SET.

(d) Proposals of such lecturers should have been forwarded to the UGC for approval."

उक्त परिच्छेदामध्ये २७ जून २०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १४ व १५ मा. खंडपीठाने आपल्या निर्णयात परिच्छेद १५ मध्ये उपपरिच्छेद १ व २ म्हणून उधृत केलेले आहेत. २७ नोव्हेंबर १९९२ च्या शासननिर्णयाने २३ ऑक्टोबर १९९२ चा शासननिर्णय तेव्हाच रद्द झाला होता. ही बाब मा.खंडपीठासमोर दुर्दैवाने मांडल्या गेली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयासमोर ती मांडली म्हणजे १९.०९.१९९१ ते २३.१०.१९९२ या काळात नेमलेले शिक्षक व २३.१०.१९९२ ते ३ एप्रिल २००० या काळात नेमलेले शिक्षक यांच्या वैधानिक स्थितीत कोणताच फरक राहत नाही.

**(F)** पुढे मा. न्यायालयाने आपल्या २८ ऑगस्ट २०१३ च्या याच निर्णयात असेही नमूद केले आहे की:-

"**18.** It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also stated that *Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment* . (Vide communication of UGC dated 26.08.2011). **This Court in its order dated 01.08.2013 has found that benefits of CAS cannot be denied to such teachers by considering them *ad hoc* appointees.**"

**(७)** सन १९९१ ते २००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांचे आता सरळसरळ दोन भाग झालेले आहेत. **एक भाग म्हणजे** सेवेच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून ज्यांना सर्व लाभ देण्यात आलेले आहेत असे शिक्षक. त्यामध्ये सुद्धा दोन प्रकार आहेत. अशा शिक्षकांची संख्या जवळजवळ ३ हजार आहे. **दुसरा भाग म्हणजे** ज्यांना असे लाभ मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होऊनही देण्यात आलेले नाहीत.

ज्यांना हे सर्व लाभ देण्यात आलेले आहेत त्यातील **पहिला प्रकार** हा २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने १९.९.९१ ते २३.१०.१९९२ या कालखंडात सेवेत आलेल्या शिक्षकांचा असून त्यांना आता हे सर्व लाभ देण्यात आलेले आहेत.

**दुसरा प्रकार** म्हणजे ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे ज्यांना हे सर्व लाभ देण्यात आलेले आहेत अशा शिक्षकांचा आहे. त्यापैकी काही शिक्षकांच्या रिकव्हऱ्या काढण्याचा प्रयत्न झाला तो मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांच्या निर्णयांनी रद्दबादल ठरविला. अशा निर्णयांची संख्या सहा असून ते निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

### Affiliated to the AIFUCTO

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या बैठकीत संमत झालेला आंदोलनाच्या ठरावानुसार*

# राज्यस्तरीय बेमुदत कामबंद आंदोलन

सोमवार, दिनांक १७ डिसेंबर २०१४

पासून आयोजित केलेले आहे.

**प्रा. ए. टी. सानप** (अध्यक्ष)

**डॉ. ताप्ती मुखोपाध्याय** (सचिव)

**(1) W.P. No. 1893 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010 Pramod D.Sonawane ...Petitioner v/s. State of Maharashtra & ors. ...Respondents CORAM: D.K.Deshmukh & N.D.Deshpande,JJ DATED: 3RD SEPTEMBER, 2010 ( P 8 B 2012)

**(2) W.P. No. 1991 OF 2011 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAYBENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 1991 OF 2011 Sheshrao Vyankatrao Shete & another PETITIONERS VERSUS The State of Maharashtra and others RESPONDENTS CORAM : D.B. BHOSALE & M.T. JOSHI, JJ. DATED : 28th MARCH, 2011 ( P 9 B 2012)

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.5271 OF 2013 CORAM : MOHIT S. SHAH, C.J. AND SUNIL P.DESHMUKH, J. DATE : 28 th AUGUST 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 145 B 2013)

**(4) W.P. No. 4994 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 4994 OF 2013 [CORAM : R . M. BORDE AND SUNIL P.DESHMUKH, J.J.] DATE : 13 th SEPTEMBER 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 205 B 2013)

**(5) W.P. No. 6659 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.6659 OF 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners VERSUS The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ. DATE :10th October, 2013. ORAL

*दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ ऑगस्ट, २००९ या कालावधीत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांना उपदानाची रक्कम रूपये पाच लाखांऐवजी रूपये ७ लाख मंजूर करण्याबाबत*

# *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग*

*शासननिर्णय क्रमांक संकीर्ण १२१४ / प्र.क्र. ११९ / विशि - २ : मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२*

## तारीख : ३१ जुलै, २०१४

**प्रस्तावना :** असोसिएशन ऑफ कॉलेज युनिव्हर्सिटी सुपरॲन्युएटेड टीचर्स असोसिएशन यांनी वित्त विभागाच्या क्रः सेनिवे १००९ / ६९ / सेवा - ४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयास आव्हान देऊन दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ या कालावधीतील सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांना उपदानाची रक्कम रूपये ५ लाखांऐवजी रूपये ७ लक्ष मिळणेबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ५२८४ / २०११ दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळली. याचिकाकर्त्यांची विनंती फेटाळल्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरूद्ध याचिकाकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ३७०० / २०१२ व सिव्हिल अपील क्रमांक ९०८ / २०१३ दाखल केले. **याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३१.०१.२०१३ रोजी निर्णय दिला असून त्यामध्ये याचिकाकर्त्यांची विनंती मान्य केली आहे.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाचे पुनर्विलोकन करण्यासाठी शासनाच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. तथापि, सदर पुनर्विलोकन याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयात सदर आदेशाचा फेरविचार करावा म्हणून Curative Petition दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, याचिकाकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका क्र. ३०७/२०१३ दाखल केली होती. सदर अवमान याचिकेमध्ये शासनाच्या वतीने दिनांक १९.१०.२०१३ रोजी आवश्यक ते प्रतिज्ञापत्र दाखल करून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१३ रोजीच्या आदेशाचा पुनर्विचार करण्यासाठी दाखल केलेल्या Curative Petition चा निर्णय प्रलंबित असल्यामुळे अवमान याचिका फेटाळण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली होती. **सदर अवमान याचिका क्र. ३०७/ २०१३ बाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०.०१.२०१४ रोजी निर्णय दिला असून, त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ३०.०१.२०१३ चे आदेश दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत अमलात आणावेत, असे आदेश देऊन अवमान याचिका निकालात काढलेली आहे.**

सदर अवमान याचिकेमध्ये शासनाच्या वतीने उत्तर देतांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केल्यास राज्य शासनावर मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे, अशा प्रकारची Cut of date विहित करण्याचा राज्य शासनास अधिकार आहे. त्याप्रमाणे उपदानाच्या संदर्भात राज्य शासनाने दिनांक २१ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयामध्ये Cut of date विहित केलेली आहे, इत्यादी मुद्दे मा. सर्वोच्च न्यायालयासमोर मांडून मा. न्यायालयाने दिनांक ३१.०१.२०१३ रोजी दिलेल्या आदेशाचा फेरविचार करण्यासाठी शासनाच्या वतीने Curative Petition दाखल करण्यास परवानगी देण्याची विनंती करण्यात आली होती. सदर विनंती मा. सर्वोच्च न्यायालयाने मान्य करून दिनांक ३१ मार्च, २०१४ पूर्वी Curative Petition दाखल करण्यात यावे, असे आदेश दिले. त्यानुसार दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी Curative Petition दाखल केले असून त्याचा Diary No. ९९९० / २०१४ असा आहे. तथापि, **सदर Curative Petition मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही स्थगिती आदेश दिलेले नसल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**

वर नमूद मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दिनांक १.१.२००६ ते ३१ ऑगस्ट, २००९ या कालावधीतील सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांना उपदानाच्या रकमेच्या फरकाची रक्कम अदा करण्यासाठी सदर रक्कम मा. सर्वोच्च न्यायालयात जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### *शासन निर्णय*

राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित शासकीय / अशासकीय अनुदानित महाविद्यालये / संस्थेतील दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांना उपदानाच्या रकमेच्या फरकाची रक्कम अदा करण्यासाठी ३९६४.९३ लक्ष इतकी रक्कम मा. सर्वोच्च न्यायालयात जमा करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) उक्त कालावधील सेवानिवृत्त अध्यापकांना उपदानाच्या फरकाची रक्कम अनुज्ञेय असल्याची खात्री संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून करण्यात येईल.

२) उपदानाच्या फरकाची गणना अचूकरीत्या केल्याची खात्री संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून करण्यात येईल.

२. सदर खर्च 'मागणी क्रमांक डब्ल्यू - २ - २२०२ - सर्वसाधारण शिक्षण १०४ - अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य (०१) अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य (०१) (०१) अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने, ३६ सहाय्यक अनुदाने (वेतने) (२२०२-०८७२)' या लेखाशिर्षाखाली सन २०१४-२०१५ मधील मंजूर तरतुदीतून खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५१६ / वय - ५, दिनांक २८.०७.२०१४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(विवेक मा. पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.) ( P 216 B 2013)

**(6) W.P. No. 5224 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.5224 OF 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners VERSUS The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ. DATE :26th September, 2013. ORAL JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.) ( P 151 B 2014)

**(६)** मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा आदेश पुढीलप्रमाणे आहे.:-

"*4. We are of the view that following the UGC Notification/ Letter dated 4-11-2008, those teachers who have not passed NET/ SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of* ***career advancement scheme*** *only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice.*"

"विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र पाठविल्याच्या तारखेपासून (या प्रकरणी ४.११.२००८) आम्ही *career advancement scheme* लागू करू." अशी नवीनच भूमिका औरंगाबादच्या सहसंचालकांनी घेतली आहे. या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की ***career advancement scheme*** या शब्दाला सुनिश्चित असा अर्थ आहे. तो अर्थ ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १२ ते १६ नुसार व १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद २(२) नुसार सुनिश्चित केलेला आहे व तो कोणालाही आपल्या आवडीप्रमाणे बदलता येत नाही. या दोनही शासननिर्णयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शनानुसार मा. राज्यपालांच्या संमतीनंतर विद्यापीठाच्या परिनियमामध्ये त्यांचे रूपांतर झालेले असल्यामुळे राज्यशासनाला सुद्धा त्यामध्ये एका रात्रीत बदल करता येत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने "*career advancement scheme* लागू करा." असा आदेश दिल्यानंतर "*career advancement scheme*" च्या स्वरूपात बदल करण्याचा प्रयत्न थेट मा. सर्वोच्च न्यायालयाचा अधिक्षेप करणारा आहे.

**(७)** (A) मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ५ मार्च २०१४ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५०२५ व ६३०९ दिलेल्या निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

"*In the light of the interim orders passed by the Honble Apex Court, we also pass similar orders as interim orders. Following the UGC Notification/Letter dated 04.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination* ***but who have completed six years of service as*** *on that date should be entitled to the* ***benefits of Carrerr Advancement*** *Scheme only for the purpose of pay-scales. The said exercise be completed within a period of six months. Same shall be subject to further orders in the matter.*"

(B) संचालक पुणे व सहसंचालक नागपूर हे दोघेही उक्त प्रकरणात प्रतिवादी होते. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सहा महिन्याच्या आत म्हणजे ५ सप्टेंबर २०१४ पूर्वी थकबाकी अदा करण्याबावतची कारवाई पूर्ण करणे आवश्यक होते. पण तशी कारवाई झाली नाही. तेव्हा १५ दिवस आणखी वाट पाहून नुटाचे सहसचिव श्री नितिन कोंगरे यांनी संघटनेच्या अधिवक्त्यांच्या मार्फत न्यायालयाचा अवमान होत असल्याबाबतची नोटीस **(सहपत्र : चार)** संचालक व सहसंचालक यांना दिनांक १७ सप्टेंबर २०१४ रोजी बजावली. त्या नोटीसचा परिच्छेद सहा पुढीलप्रमाणे :-

"That, you noticee being High Rank Officers and considering the effects of contempt proceedings on your careers, this notice is issued to you in order to bring to your notice the contempt committed by you and to grant you an opportunity to correct yourselves."

(C) न्यायालयाचा अवमान होत असल्याची दिनांक १७ सप्टेंबर २०१४ रोजीची नोटीस मिळाल्यानंतर सहसंचालक, उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०१४ रोजी एक परिपत्रक **(सहपत्र : तीन)** काढून निरनिराळ्या महाविद्यालयांना "संबंधित याचिकाकर्ता यांच्या बाबतीत विद्यापीठाद्वारे गठीत करण्यात आलेली निवड समितीची शिफारस व वरील **मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालयाचे आदेश यामध्ये तफावत दिसून येत असून त्यानुसार समितीच्या शिफारशीमध्ये सुधारणा होणे अभिप्रेत आहे.**" असे कळविले आहे. त्याच पत्रात त्यांनी महाविद्यालयांना "कॅसचे लाभ अदा करण्याकरीता यु.जी.सी/विद्यापीठाचे/शासनाच्या प्रचलित नियमानुसार विशिष्ट कार्यपद्धती व सुनिश्चित नियमावली चे पालन करून या कार्यालयास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे." असेही कळविले आहे.

**(८)** (A) नागपूर विभागाचे सहसंचालक आपले पाऊल मागे घेतील किंवा घेणार नाहीत पण त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या आधारे याबावत संक्षिप्त 'रिफ्रेशर कोर्स' त्यांच्यासाठी या परिच्छेदातून आयोजित केलेला आहे. २१ मूळ याचिकाकर्त्यांनी जो निदेशार्थ अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर केलेला आहे. त्यातील परिच्छेद ७ व ८ पुढीलप्रमाणे आहे.

"7. Thereafter, in its 452nd meeting dated 7th & 8th October 2008, UGC took a decision that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview

ITEM NO.10 COURT NO.9 SECTION IVB

## SUPREME COURT OF INDIA

RECORD OF PROCEEDINGS

Petition(s) for Special Leave to Appeal (C) No(s). 26907/ 2013 (Arising out of impugned final judgment and order dated 14/01/2013 in LPA No. 1955/2012 passed by the High Court Of Punjab & Haryana At Chandigarh)

STATE OF HARYANA & ANR Petitioner(s) VERSUS SATYA PAL YADAV & ANR Respondent(s) WITH SLP(C) No. 26908-26911 / 2013 (With Office Report)

SLP(C) No. 32259/2013 (With Office Report)
SLP(C) No. 36488/2013 (With Office Report)
SLP(C) No. 34641/2013 (With Office Report)
SLP(C) No. 34643/2013 (With Office Report)
SLP(C) No. 4766-4767/2014 (With Office Report)
SLP(C) No. 34644/2013 (With Office Report)
SLP(C) No. 6420-6425/2014 (With Office Report)

### Date : 10/07/2014

These petitions were called on for hearing today.

:CORAM :
HON BLE MR. JUSTICE DIPAK MISRA
HON BLE MR. JUSTICE V. GOPALA GOWDA

**For Petitioner(s)** : Mr. Neeraj Jain, Sr. Adv. Ms. Anubha Agrawal ,Adv.**For Respondent(s)** : Dr. Rajeev Dhawan, Sr. Adv. Mr. Bharat Sangal ,Adv. Mr. Srijna Lame, Adv.Mr. Anil Kumar Sangal, Adv. Mr. Siddharth Sangal, Adv. Mr. Debasis Misra, Adv. Mr. R. C. Kaushik, Adv. Mr. Arvind Kumar Gupta, Adv.Mr. Anshul Garg, Adv. Mr. Rajiv Kumar, Adv. Mr. Dinesh Verma, Adv. Mr. Prabhoo Dayal Tiwari, Adv. Mr. Subhasish Bhowmick, Adv.

UPON hearing the counsel the Court made the following

**O R D E R**

Heard Mr. Neeraj Jain, learned senior counsel for the petitioners and Mr. Bharat Sangal, learned counsel for the respondents. We are convinced that there is no substance in these special leave petitions and they are accordingly **DISMISSED** without any order as to costs.

(NAVEEN KUMAR) **COURT MASTER** (RENUKA SADANA)

**NOTE** :- The original High Court Judgment "IN THE HIGH COURT OF PUNJAB AND HARYANA AT CHANDIGARH in LPA No.1955 of 2012 : Date of decision:14.01.2013. State of Haryana and another ...Appellants **VERSUS** Satyapal Yadav and another ...Respondents" is circulated on page 176 of 2014 NUTA Bulletin.

and the candidates had continued in services for 5 or more years, NET/SLET qualification was relaxed. The said recommendations are mentioned at point 6.06 of minutes of meeting dated 7th & 8th October 2008, of UGC.

8.Subsequently, UGC forwarded letter dated 04,11.2008 to the Registrar of University/Respondent No.22 informing about the exemption granted to the Applicants from NET examination for the appointment as Lecturers. For the sake of convenience the said Letter is being annexed again in the present Application. True Copy of letter dated 04.11.2008 issued by UGC to the Registrar of University/Respondent No.22 is annexed herewith & marked as ANNEXURE-A1 (Pgs-13-15)"

(B) ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने काही धोरणात्मक निर्णय घेतले. ज्यात एक निर्णय पुढील प्रमाणे आहे :- "The matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had **continued service of 5 or more years** the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :- (**i**) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee. (**ii**) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections."

(C) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ७ व ८ ऑक्टोबर २००८ च्या या निर्णयाप्रमाणेच ४ **नोव्हेंबर २००८ चे** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवांना पत्र (मूळ याचिकेच्या पेपरबुकात पृष्ठ १९ ते २१ वर) रवाना झाले. त्या पत्राला समोर ठेवूनच मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबरची इंटेरिम ऑर्डर केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्णय घेतांना "Continued service of 5 or more years" अशा शब्दांचा वापर केला. तर आता मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात "Completed six years of service" असे शब्द वापरले आहेत. पत्राच्या तारखेपासून म्हणजे ४ नोव्हेंबर २००८ पासून सेवा धरावयाची म्हणजे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ४ नोव्हेंबर २००८ च्या पत्रामध्ये "Continued service of 5 or more years" अशी शब्दरचना वापरलेली आहे हे लक्षात घेऊन आपल्या निर्णयात "Completed six years of service" अशी जी शब्दरचना वापरली त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची पुर्नरचना करण्याचा अधिकार वापरण्यासारखे होय व तसा अधिकार या देशाच्या घटनेने औरंगाबादच्या सहसंचालकांना प्रदान केलेला नाही.**

**(९)** (A) तिकडे मराठवाडा विभागात विद्यापीठ अनुदान आयोगाने ४ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये मुळ याचिकाकर्त्यांना एक्झमशन दिल्याचे कळविले. इकडे विदर्भात **दिनांक ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एकूण ८३७ प्राध्यापकांना नेटसेट मुक्तता प्रदान केली होती.** विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट मुक्तता दिली. पण राज्यशासनाकडून म्हणजेच नागपूर विभागाच्या सहसंचालकांकडून काहीच कारवाई होत नसल्याने संघटनेतील एक ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रपूर येथील **प्रा.टिकाराम देवाजी कोसे** यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह मा.

*राज्यातील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करणेबाबत.*

# महाराष्ट्र शासन : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

*शासन निर्णय क्रमांक : सीएसडब्ल्यू - २०१४/प्र.क्र. २१५/सामासु : मंत्रालय, मुंबई ४०००३२*

## दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१४

**प्रस्तावना** : सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाच्या स्थापनेच्या दिनांकापासून अंशदायी निवृत्तीवेतन योजना (Contributory Provident Fund) लागू होती. या कर्मचाऱ्यांनी त्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करणेबाबत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथे याचिका क्र. ६८२/२०१२ आणि याचिका क्र. ३२७७/२०१२ व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ४८०२/२०१० आणि याचिका क्र. ७९५१/२०११ दाखल केल्या होत्या. यासर्व याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ यांनी समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कमचाऱ्यांना निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करण्याचे आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयाविरूद्ध मा. सर्वोच्च न्यायालयात शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका तसेच पुनर्विलोकन याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करणेबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळांच्या बैठकीत सादर करण्यात आला. **सदर प्रस्तावास मंत्रीमंडळाच्या दि. २८.८.२०१४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालय व मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील समाजकार्य महाविद्यालयात दि. १.११.२००५ पूर्वी नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन होती.**

### *शासन निर्णय:*

सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाच्या स्थापनेच्या दिनांकापासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार अनुज्ञेय असलेली सेवानिवृत्ती व उपदान योजना, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना, या नियमातील सर्व तरतुदींसह तसेच त्यामध्ये वेळोवेळी झालेले बदल व सुधारणांसह योग्य त्या फेरफारास दिनां १.११.२००५ पूर्वी नियुक्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना दि. २ सप्टेंबर १९९९ पासून लागू करण्यात येत आहे.

२) या शासन निर्णयाच्या प्रयोजनार्थ

अ) अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालय म्हणजे खाजगी संस्थेद्वारा चालविण्यात येणारे, सामाजिक न्याय विभागाअंतर्गत येणारे व राज्यातील संबंधित अकृषी विद्यापीठाशी संलग्नित असलेले व सामाजिक न्याय विभागातर्फे अनुदान मिळणारे समाजकार्य महाविद्यालय होय.

ब) समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अशासकीय अनुदानित समाजकार्य प्राध्यापक, व्याख्याता / अधिव्याख्याता, ग्रंथपाल, निबंधक, अधिक्षक, लेखापाल, लिपीक टंकलेखन, फाईल क्लार्क, सहाय्यक ग्रंथालय सहाय्यक, शिपाई, पहारेकरी, सफाईगार, माळी, वाहन चालक, वसतीगृह अधिक्षक व इतर कर्मचारी जे विहीत केल्या आकृतीबंधाप्रमाणे आहेत व ज्यांना वेतनावर शासनमार्फत अनुदान दिले जाते.

३) या निर्णयानुसार अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातून निवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील परिशिष्टानुसार निवृत्तीवेतनाबाबतचे कागदपत्र भरून घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील. शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्यात ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मध्ये देण्यात आलेल्या परिशिष्टानुसार कागदपत्रे तपासून महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. महालेखापाल कार्यालयाकडून Pension Payment Order प्राप्त झाल्यानंतर कोषागार कार्यालयामार्फत निवृत्तीवेतन व त्याबाबतचे लाभ अदा करण्यात येतील. निवृत्तीवेतन मिळण्याकरीता संबंधित

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दिनांक २५ ऑगस्ट २०१० रोजी एक याचिका दाखल केली (सन २०१० ची याचिका क्रमांक ४९०९) अर्जदारांचे मुख्य म्हणणे असे होते की "विद्यापीठ अनुदान आयोगाने आता नेट-सेट मुक्तता घोषित केल्यामुळे ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरून स्थाननिश्चितीचे (CAS) सर्व लाभ अर्जदारांना अदा करण्यात आले पाहिजेत."

(B) मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये राज्यशासनाच्या वतीने दिनांक २९ मार्च २०११ रोजी १० परिच्छेदांचे एक शपथपत्र दाखल करण्यात आले होते. कोणत्या तारखेपासून नेट-सेट मुक्तता लागू होते याची तारीख जर विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला कळविली तर या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे अनुषंगिक लाभ दिले जातील. असे शासनाने प्रतिज्ञेवर या शपथपत्रात नमूद केले होते. ते शब्दश- पुढील प्रमाणे :- "*In the event of supplying the date of exemption if they obtained from the University Grants Commission the consequential benefits* as ***per the Career Advancement Scheme could be granted to the petitioners***" एकदा तारीख कळू द्या, राज्य शासन या शिक्षकांना स्थाननिश्चितीचे (CAS) लाभ द्यायला तयार आहे अशी हमी या शपथपत्रात पुढील शब्दात देण्यात आली होती. :- "*It is for the petitioners to provide the date of exemption to the State Government regarding exemption from not qualifying the NET / SET Examination. After receipt of the date* of exemption from *petitioners the **State Government can very well grant benefits of Career Advancement Scheme to the petitioners***" राज्य शासनाच्या त्या शपथपत्रात परिच्छेद ९ व १० मध्ये उक्त मजकुर समाविष्ट आहे. **२६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने ही तारीख आता कळविलेली आहे.**

(C) या प्रकरणात विद्यापीठ अनुदान आयोगाचे म्हणणे काय होते हे सुद्धा या निर्णयातच नमूद आहे. ते पुढील शब्दात :- "Shri Mishra, learned Assistant Solicitor General for respondent no.5, states that if the State Government requests the University Grants Commission to declare the said date of exemption or provide information in this regard, the same shall be provided to the State Government as per direction of this Court."

(D) याच निर्णयात मा. खंडपीठाने पुढे असेही नमूद केलेले आहे की: "In the backdrop of the above referred facts, it is apparent that though the University Grants Commission vide notification dated 5/11/2008 exempted Lecturers from clearing NET/SET examination, however, only because the date from which such exemption would come into effect was not communicated/declared by the University Grants Commission, the claims of the petitioners for grant of senior grade pay scale as per Career Advancement Scheme could not be finalized by the State Government. **The State Government is ready and willing to consider the claims of the petitioners for grant of benefits under Career Advancement Scheme provided University Grants Commission communicates the date from which exemption granted vide notification dated 5/11/2008 becomes effective.** It is also brought to the notice of this Court that the State Government has already made a request to the University Grants Commission in this regard."

---

कर्मचाऱ्यांनी वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक निवेयो-१००७/प्र.क्र. १२० / कोषा - प्र. ५ दिनांक १८.८.२००८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४) अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू असल्यामुळे जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत, त्यांना या योजनेंतर्गत जमा असलेल्या रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. निवृत्तीवेतन व उपदान योजना लागू करावयाच्या शासनाच्या निर्णयामुळे अंशदायी निवृत्तीवेतन योजनेंतर्गत संस्थेचे अंशदान व त्यावरील व्याज ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्याने शासनास परत करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेली रक्कम (संस्थेच अंशदान व त्यावरील व्याज) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीवर वेळोवेळी ठरविण्यात आलेल्या व्याजाच्या दरानुसार वसुल करण्यात यावी. तसेच या कर्मचाऱ्यांनी अंशदायी निवृत्तीवेतन योजनेंतर्गत दरमहा मिळणारे निवृत्तीवेतन घेतले असल्यास ती रक्कमही त्यांच्याकडून वसुल करण्यात यावी. या कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्तीच्या दिनांकापासून निवृत्तीवेतन व उपदान योजनेचे लाभ द्यावयाचे आहेत. त्यामुळे त्यांना देण्यात येणाऱ्या थकबाकीच्या रकमेतून ही वसुली समायोजित करण्यात यावी. ज्या प्रकरणात देण्यात आलेली रक्कम ही द्यावयाच्या रकमेपेक्षा जास्त असेल त्या प्रकरणात कर्मचाऱ्याकडून अंशदायी भविष्य निर्वाह निधी मधील व्यवस्थापनाचा हिस्सा व त्यावरील व्याजाची रक्कम जमा करावयाची असून यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या जमा लेखाशीर्षामध्ये सदरची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करावी. सदरचे लेखाशीर्ष स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. संबंधित कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेल्या रकमेची कागदपत्रे तपासून सर्व रक्कम समायोजित / वसूल करण्यात आल्याची खात्री करण्याची जबाबदारी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

५) समाजकार्य महाविद्यालयातून दि. १.१.१९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १०९९/३०३/ सेवा-४ दिनांक १५.११.१९९९ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार निश्चित करावे.

दिनांक १.१.१९९६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मच्याऱ्यांचे निवृत्तीवेतन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १०९९/३०२/सेवा-४ दिनांक १५.११.१९९९ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार निश्चित करावे.

दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १००९/प्र.क्र. २९/ सेवा-४ दिनांक ५.५.२००९ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार निश्चित करावे.

दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १००९/प्र.क्र. ३३/सेवा-४ दिनांक ३०.१०.२००९ व दिनांक १५.१२.२००९ च्या शुद्धिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार निश्चित करावे.

६) जे कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांची अंशदायी भविष्य निर्वाह निधीची खाती बंद करण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी करावी. तसेच कर्मचाऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा असलेले संस्थेचे अंशदान व व्याज ही एकत्रित रक्कम यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या जमा लेखाशिर्षामध्ये सदरची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करावी. सदरचे लेखाशिर्ष स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. संबंधित कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची खाती उघडून त्यात त्यांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधीची जमा असलेली रक्कम विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून जमा करण्यात यावी. महाविद्यालयात दि. ३१.१०.२००५ पर्यंत नियुक्त कर्मचाऱ्यांकडून या आदेशाच्या दिनांकापासून भविष्य निर्वाह निधी योजनेच्या अंशदानाची वसुली करण्यात यावी.

७) महाविद्यालयात दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो/१००५/ १२६/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ अन्वये लागू केलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. या योजनेबाबतच्या कार्यपद्धतीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

८) या निवृत्ती वेतन योजनेपाटी होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक एन - ३
२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ८०० व इतर खर्च
(०३) समाजकल्याण संस्थांना अनुदाने
(०३) (०१) समाजकल्याण संस्थांना अनुदाने
३६, सहायक अनुदाने (वेतन) (२२३५१५०३)

९) हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२०/२०१४/सेवा-४, दिनांक २२.१०.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१०) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४१०२९१२५८०५८९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.
**(सिद्धार्थ झाल्टे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

** AF : P339 **

(E) शेवटी मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २० एप्रिल २०११ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये पुढील प्रमाणे आदेश पारित केले. "In the above background, **We direct the respondent no.5 University Grants Commission to communicate to the State Government the date when such exemption became effective as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks** from the date of communication of this order. **We direct the State Government to reconsider the claims of the petitioners on receipt of communication from the University Grants Commission in respect of effective date of exemption,** in accordance with law and procedure applicable in this regard at the earliest. With these observations and directions, the petition is disposed of."

**(१०)** (A) मा. नागपूर खंडपीठाच्या उपरोक्त निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाला याबाबत निर्णय घ्यावा लागला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ८ जुलै २०११ रोजीच्या निर्णयामध्ये कोणत्या तारखेपासून त्या प्रत्येक शिक्षकांची सेवा धरली जाईल याबाबतचा स्पष्ट उल्लेख नव्हता ही गोष्ट लक्षात आल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ७ ऑगस्ट २०११ रोजीच्या बैठकीत केलेल्या ठरावात अशी मागणी केली होती की, "त्या प्रत्येक नेमणूकीला मान्यता देण्याची केलेली प्रत्येक विनंती (Representation) विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेली असतांना "हा निर्णय महाराष्ट्र शासनाला व विद्यापीठांना कळवितांना कोणतीही गोष्ट मोघमपणे कळवून चालणार नाही. या निर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या "प्रत्येक शिक्षकाची सेवा स्थान निश्चितीच्या प्रयोजनासाठी कोणत्या दिनांकापासून धरावी?" या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला कळविले पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे **कारण तसे मा. उच्च न्यायालयाचे आदेशच आहेत** व या प्रश्नाचे स्पष्ट व कायदेशीर उत्तर "**नेमणूकीच्या दिनांकापासून**" असेच आहे कारण तसे मा. सर्वोच्च न्यायालयाचेच आदेश आहेत, अत्एव तसे तातडीने कळविले जावे अशी विनंती करण्यात येत आहे."

(B) विद्यापीठ अनुदान आयोगाने ५.११.२००८ च्या पत्रात एक्झम्शन देतांना कोणत्या तारखेपासून लाभ द्यावेत हे आयोगाने आम्हाला कळविले नाही असा मुद्दा शासनाच्या वतीने खंडपीठासमोर मांडण्यात आला होता. २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झमशन दिले व नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरण्यास सांगितले हे मा. खंडपीठाच्या निर्णयातच आलेले आहे. दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५२७१४ मध्ये मा. औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयातील परिच्छेद १८ मधील पुढील उल्लेख पहा.:- "It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## जिल्हा अधिवेशनांचे आयोजन

विदर्भातील नुटाच्या सर्व जिल्ह्यांची अधिवेशने एकाच दिवशी व दिनांकाला आयोजित करण्यात आलेली आहेत.

### दिवस व दिनांक

(१) जिल्हा अधिवेशनाचा दिनांक : २९ नोव्हेंबर २०१४

(२) जिल्हा अधिवेशनाची वेळ : दुपारी ३.३० वाजता

(३) जिल्हा अधिवेशनाचा दिवस : शनिवार,

### स्थळ

ही जिल्हा अधिवेशने खाली दर्शविलेल्या स्थळी होतील.

**१. नागपूर शहर :** सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज, रविनगर, नागपूर.

**२. नागपूर ग्रामिण :** सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज,रविनगर, नागपूर.

**३. वर्धा** : यशवंत महाविद्यालय, वर्धा.

**४. भंडारा :** जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा

**५. गोंदिया :** डी.बी.सायन्स कॉलेज, गोंदिया.

**६. चंद्रपूर :** एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर.

**७. गडचिरोली :** किसनजी खोब्रागडे शिक्षण महाविद्यालय, गडचिरोली.

**८. अमरावती :** केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.

**९. यवतमाळ :** अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ.

**१०. अकोला :** आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला.

**११. वाशिम :** राजस्थान आर्यन कॉलेज, वाशिम.

**१२. बुलढाणा** : जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा.

या सर्व जिल्हा अधिवेशनाला त्या त्या जिल्ह्याचे अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी संबोधीत करतील. या सभेमध्ये मुख्यत्वे पुढील प्रश्नांवर चर्चा होईल. :- (१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २ नोव्हेंबर २०१४ च्या बैठकीत संमत केलेला ठराव विचारात घेणे व आंदोलन यशस्वी करण्यासाठीची कृतियोजना निश्चित करणे. (२) नेटसेटबाबत मा. उच्च न्यायालयासमोरील घटनाक्रमाचा आढावा घेणे. (३) इतर प्रश्नावाबत चर्चा

सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहून जिल्हा अधिवेशने यशस्वी करावी. अशी विनंती आहे.

**प्रा. प्रवीण रघुवंशी,** ***अध्यक्ष*** **डॉ. अनिल ढगे,** ***सचिव***

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

### जिल्हा युनिटचे अध्यक्ष व सचिव यांची सभा

सर्व जिल्हा युनिटचे अध्यक्ष व सचिव यांची सभा रविवार, दिनांक ७ डिसेंबर २०१४ रोजी शिक्षक भवन, विद्यापीठ परिसर सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये जिल्हा अधिवेशनामध्ये झालेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल व करावयाच्या उपाययोजना विचारात घेण्यात येतील. सर्व जिल्ह्याच्या अध्यक्ष व सचिवांनी या सभेला उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात येत आहे.

**प्रा. प्रवीण रघुवंशी,** ***अध्यक्ष*** **डॉ. अनिल ढगे,** ***सचिव***

### मा. न्यायालयाच्या अवमान याचिका प्रक्रियेचा प्रभाव : 9

राज्यकर्ते निर्णय घ्यायला तयारच नसतील तर नागरिकांना न्यायालयात धाव घ्यावी लागते. आज डझनावारी विषयावर अनेक डझन याचिकांच्या माध्यमातून शेकडो प्राध्यापक आपल्या अधिवक्त्यामार्फत न्यायालयात संघर्ष करीत आहेत. राज्यकर्ते खूपच निगरगट्ट असतील तर मा. न्यायालयाचा निर्णय होऊनसुद्धा जागचे हालत नाहीत. तेव्हा न्यायालयाच्या अवमान याचिकेची प्रक्रिया सुरू करण्याशिवाय गत्यंतर राहत नाही. अवमान याचिकेची प्रक्रिया ही या देशातील नागरिकांना घटनेने व कायद्याने उपलब्ध करून दिलेली अत्यंत प्रभावी अशी व्यवस्था होय. त्या प्रक्रियेचा परिणाम नक्कीच होतो. अशा प्रक्रियेच्या वापरामुळे सुटलेल्या प्रश्नांची माहिती क्रमशः देण्यात येत आहे.

सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी ३१ जूलै २०१३ पूर्वी अदा केली जाईल असे शासनाच्या वतीने १० मे २०१३ रोजी न्यायालयात सांगण्यात आले होते. मात्र त्या शब्दांचे पालन झाले नाही. २२ ऑक्टोबर २०१३ रोजी संघटनेने संचालक उच्च शिक्षण व प्रधानसचिव उच्च शिक्षण यांना अवमान याचिकेची नोटीस (P3 of NB14) दिली. त्याबरोबर सूत्रे हलली. उच्चशिक्षण संचालकांनी ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी आदेश (क्रमांक अर्थस १३-१४/८० टक्के वाटप / लेखा ७९४४) निर्गमित केला व पुढच्या महिन्यात बहुतेक सहसंचालकांनी या थकबाकीचे वाटप केले. सर्वांत 'ढांग' नंबर अमरावती सहसंचालक कार्यालयाचा लागला. त्यांना पुन्हा अवमान याचिकेची नोटीस (P102 of NB14) दिनांक १४ मार्च २०१४ रोजी देण्यात आली. तेव्हा त्यांनी ५ एप्रिल २०१४ रोजी एक परिपत्रक (P103 of NB14) काढून एकट्या अमरावती विद्यापीठातील शिक्षकांना २ कोटी ४५ लक्ष रूपयाची थकबाकी अदा केली. अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील संलग्न महाविद्यालयातून २० ते २२ कोटी रूपयाची थकबाकी एप्रिल २०१४ च्या पहिल्या आठवड्यात अदा करण्यात आली. अशारितीने १ जानेवारी २००६ रोजी पदासीन असलेल्या **महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांची अंदाजे रूपये १५०० कोटींची थकबाकी अदा करण्याचा अध्याय मुळात न्यायालयाच्या निर्णयाने व त्यानंतर अवमान याचिकांच्या सपाट्याने संपुष्टात आला.** - संपादक

stated that *Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment*. (Vide communication of UGC dated 26.08.2011)."

(C) "आपण शासनातर्फे नागपूर खंडपीठासमोर प्रतिज्ञापत्र दाखल केले व **"शासन 'कॅस' चे लाभ द्यायला तयार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला तारीख कळवावी" असे शासनाने शपथेवर उच्च न्यायालयासमोर सांगीतले याचा नागपूरच्या सहसंचालकांना विसर पडल्यामुळे उपरोक्त मुद्दे 'रिफ्रेशर' म्हणून मांडले आहेत.** याचा औरंगाबादच्या सहसंचालकांना सुद्धा लाभ होईल. कारण नागपूर खंडपीठासमोर महाराष्ट्र शासनाच्यावतीने सादर करण्यात आलेले शपथपत्र "मराठवाड्याला लागू नाही" अशी भूमिका सहसंचालक किंवा शासनसुद्धा घेऊ शकत नाही. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाचा १८ नोव्हेंबर २०१३ चा अंतरिम आदेश आला. सहसंचालक जागचे हलायला तयार नव्हते. तेव्हा अनेक शिक्षकांना पुन्हा उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली.

**(११)** सन २०१० ची याचिका क्रमांक ४९०९ दाखल करून नागपूर खंडपीठाचे "तारीख कळविण्याबाबत युजीसीला आदेश" मिळविणाऱ्या प्रा.टिकाराम देवाजी कोसे व त्यांच्या सहकाऱ्यांवर तसेच इतर अनेक शिक्षकांवर सर्वोच्च न्यायालयाचा अंतरीम आदेश झाल्यावर पुन्हा उच्च न्यायालयासमोर जाण्याची वेळ आली. प्रतिज्ञेवर दाखल केलेल्या शपथपत्रात नमूद केलेली कारवाईसुद्धा शासन करीत नसल्यामुळे पुन्हा प्रा. टिकाराम देवाजी कोसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सन २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर १८ परिच्छेदांची सन २०१३ ची याचिका क्रमांक ५०२५ दाखल केली. या याचिकेच्या परिच्छेद ७ मध्ये या शिक्षकांची ही व्यथा पुढील शब्दात मांडण्यात आलेली आहे. :-

"7. That, the respondent State filed their affidavit in reply dated 29.03.2011 in the above W.P. No.4909/2010 admitting the claim of the petitioners but the only reason for not extending the benefits was given that the effective date of exemption is not known to the State. It was further mentioned in the affidavit that, *"In the event of supplying the date of exemption if they obtained from the University Grants Commission the consequential benefits* as *per the Career Advancement Scheme could be granted to the petitioners"* (Para 10). An undertaking was also given in the same affidavit as *"It is for the petitioners to provide the date of exemption to the State Government regarding exemption from not qualifying the NET / SET Examination. After receipt of the date* of *exemption from petitioners the State Government can very well grant benefits of Career Advancement Scheme to the petitioners"* (Para 9). Copy of the affidavit in reply of respondent no.3 is annexed herewith and marked as ANNEXURE-F" या आताच्या याचिकेच्या पेपरबुकामध्ये पृष्ठ ८० ते ८७ वर राज्य शासनाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ४९०९ मध्ये दिनांक २९ मार्च २०११ रोजी दाखल केलेले त्यावेळचे शपथपत्र सहपत्र 'एफ' म्हणून आता पुन्हा जोडलेले आहे.

या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ५ मार्च २०१४ रोजी पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. :-

"In the light of interim orders passed by Hon ble Apex Court, we also pass similar orders as interim orders. Following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of **career advancement scheme** only for the purpose of payscales. The said exercise be completed **within a period of six months.** Same shall be subject to further orders in the matter."

**(१२)** एवढा सारा प्रवास करून टिकाराम देवाजी कोसे व त्यांचे सहकारी सहसंचालक नागपूर यांच्या कार्यालयात पोचले तर ते जागचे हलायला तयार नाहीत. तेव्हा अवमान याचिकेची नोटीस (सहपत्र : चार) दिनांक १७ सप्टेंबर २०१४ रोजी दिली तर या सहसंचालकांनी "कोणतीही कारवाई न करता कारवाई करीत आहोत" हे दाखविण्यासाठी २४ सप्टेंबर २०१४ चे पत्र निर्गमित केले.

आपल्या शासनाने नागपूर खंडपीठासमोर काय शपथपत्र दाखल केले होते हे वाचायला कोणी तयार नाही, career advancement scheme या शब्दांचे अर्थ आपल्याला आपल्या लहरीप्रमाणे बदलता येत नाहीत, याची त्यांना जाणीव नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाचा नेट-सेट बाबत अंतिम शब्द असलेला १९९४ चा निर्णय वाचायला कोणाला वेळ नाही. १८ नोव्हेंबर २०१३ चा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पुनर्रचित करण्याचा आपल्याला अधिकार नाही याची औरंगाबादच्या सहसंचालकांना जाणीव नाही, ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १२ ते १६ नुसार त्या शब्दांचा अर्थ सुनिश्चित केलेला आहे याची सहसंचालकांना निश्चितच माहिती नाही, प्रत्येक सहसंचालक स्वतंत्र संस्थान असल्यासारखे वर्तन करीत आहे. औरंगाबादच्या सहसंचालकांनी ४ नोव्हेंबर २००८ पासून सेवा धरू असे लेखी कळविले तर नागपूरच्या सहसंचालकांनी "निर्गुण निराकार" स्वरूपाचे पत्र पाठविले. केव्हापासून सर्व्हिस धरू याबाबत "सुनिश्चित नियमावलीप्रमाणे तुम्हीच निश्चित धरून आणा" असे साऱ्याच अनिश्चितीचे प्रदर्शन करणारे पत्रक त्यांनी पाठविले. "वेड्यासारखे हातवारे करणारा अवलीया" काय म्हणतो? हे जसे आपल्याला कळत नाही तसे ते पत्र कितीही वेळा वाचले तरी सुनिश्चित नियमावलीप्रमाणे "केव्हापासून धरावे?" व "केव्हापासून धरू नये?" याबाबत काहीही बोध होत नाही.

**(१३)** महाराष्ट्रातील १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालखंडातील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या ८ जुलै २०११ च्या बैठकीत ("2.09 **:** To Consider the representations received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19.09.1991 till 03.04.2000." या विषयावर) घेतलेल्या निर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे लक्षात येईल की त्या निर्णयामध्ये फक्त महाराष्ट्राचा विचार झालेला आहे व त्यातही "appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000" यांचा विचार झालेला आहे. **ही एक वेगळी विशिष्ट स्थिती आहे** हे लक्षात घेऊनच आयोगाने तो निर्णय घेतला आहे.

१९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० पावेतो महाराष्ट्रातील सर्व नेमणूका एकाच स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या असतांना, समान स्थितीमध्ये समान वागणूक न देता, विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यापूर्वी तुकड्या तुकड्याने अनेक वेगवेगळे निर्णय घेतले होते व त्यामुळे या वर्गवारीतील शिक्षकांची सुद्धा अनेक तुकड्यांमध्ये विभागणी झाली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने आता घेतलेल्या या निर्णयामुळे या वर्गातील शिक्षकांसाठी यापूर्वी घेतलेल्या निर्णयाचे अनेक तुकडे एकत्र आले असून **आता या सर्वांसाठी आयोगाने एकच निर्णय घेतलेला आहे.** हा निर्णय २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये कळविण्यात आला असून आता दिनांक २३ जानेवारी २०१४ रोजी रमेश सोनटक्के विरूद्ध महाराष्ट्र शासन या सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५०७३ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.:-

"RULE : The respective counsel waive notice. As the Hon ble Apex Court has granted interim relief, in same terms we grant the interim relief as under :

**We are of the view that following the UGC Notification/ Letter dated 26.08.2011,** those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of payscales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice. The State Government shall attempt to disburse the amount due and payable to eligible petitioners within a period of six months from today."

आता औरंगाबादच्या सहसंचालकांनी जो गैरअर्थ लावला आहे तो अर्थ धरला तर विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र पाठविले त्या तारखेपासून म्हणजे २६ ऑगस्ट २०११ या तारखेपासून Career Advancement Scheme लागू होईल. पण त्या २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रामध्येच विद्यापीठ अनुदान आयोगाने "Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment." असे नमूद केले आहे व नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरावी असे नमूद असलेला २६ ऑगस्ट २०११ रोजीचा हा आदेश १९९१ ते २००० या काळातील सर्व बिगर नेट-सेट शिक्षकांना नेटसेट पासून मुक्तता

देणारा आहे व तो त्या सर्वांना लागू आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने हा निर्णय महाराष्ट्र शासनाने स्वतंत्रपणे केलेल्या विनंतीवरून घेतलेला आहे. शिवाय मा. उच्च न्यायालयाचेसुद्धा तसे आदेश होते.

**(१४)** या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचा आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. शरदेंदु भूषण विरूद्ध नागपूर विद्यापीठ या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २९ सप्टेंबर १९८६ रोजी हा निर्णय दिलेला आहे. (AIR 1988 Supreme Court 335)

(A) श्री. शरदेंदु भूषण हे त्यावेळी नागपूरच्या मोहता सायन्स कॉलेजमध्ये अधिव्याख्याते होते. तेथे सेवेत येण्यापूर्वी कलकत्ता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये त्यांनी काही वर्षे सेवा केलेली होती. तसेच कलकत्ता विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातून मोहता विज्ञान महाविद्यालयात नागपूर येथे रूजू होण्यापूर्वी त्यांच्या सेवेमध्ये २ वर्षाचा खंड पडलेला होता. त्यांची पाच वर्षांची सेवा ही नागपूर विद्यापीठांतर्गत नाही व त्यांची सेवा अखंडीत नाही या दोन कारणावरून "५ वर्षांच्या सेवेनंतर अनुज्ञेय असलेले सिनिअर स्केल" त्यांना नाकारण्यात आले. त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली पण तेथे त्यांना अपयश आले.

(B) प्रकरण जेव्हा सर्वोच्च न्यायालयात गेले तेव्हा तेथे मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात निर्णय झाला. "Experience of University teaching up to degree classes for a period of five years" असा निकष आहे, ही गोष्ट उच्च न्यायालयाच्या लक्षात आली नाही आणि त्यामुळेच " The High Court obviously fell into an error in assuming that the length of service within the University was the basis" असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले. एकाच विद्यापीठात किंवा एकाच महाविद्यालयात सेवा असावी हा मुद्दा मा. सर्वोच्च न्यायालयाने वरप्रमाणे फेटाळून लावला व त्याच बरोबर सेवा अखंडीत असावी हाही मुद्दा पुढील शब्दात फेटाळून लावला. " That was not the question before the High Court and merely because there was a break of two years service between the date of resignation of the appellant from a college affiliated to the Calcutta University and the date of his employment as a Lecturer in MM Science College affiliated to the Nagpur University, could not be regarded a continuous service for purposes of determining his seniority was no ground for denial of the higher grade."

(C) शेवटी या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश दिले.:- "In the premises, we allow the appeal with costs. The judgment and order of the High Court are set aside. We order the Nagpur University to issue a direction to the M.M. Science College, Nagpur to accord to the appellant the benefit of the higher grade of Lecturer (Senior Scale) to which he is entitled, taking into account the period of his service in colleges affiliated to the Calcutta University."

(D) त्यावेळी सिनिअर स्केलसाठीचे निकष काय होते? याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रकरण उच्च न्यायालयात गेले तेव्हा सिनिअर स्केलमध्ये जाण्यासाठी "Experience of University teaching up to degree classes for a period of five years" असा निकष त्यावेळी होता. मूळ २१ याचिकाकर्त्यांच्या प्रकरणामध्ये ११ डिसेंबर १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे याबाबतीत "Minimum length of service for eligibility to move into the grade of Lecturer (Senior Scale) would be four years for those with Ph.D. five years for those with M.Phil, and six years for others at the level of Lecturer..." अशी शब्दरचना होती व पुढे ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयात सुद्धा तशीच शब्दरचना कायम राहीली.

शेवट काय? तर वरिष्ठ श्रेणीमध्ये किंवा निवडश्रेणीमध्ये स्थान निश्चियन देतांना सेवा / अनुभव हा मुख्य निकष आहे. ("Experience is the basis of placement") **असा हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की उपरोक्त प्रकरणातील २१ मूळ याचिकाकर्त्यांची सेवा अखंडीत आहे व ती सर्व सेवा एकाच विद्यापीठांतर्गत एकाच महाविद्यालयात आहे.**

**(१५)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने विधितज्ज्ञांचा कायदेशीर सल्ला घेऊन पुढीलप्रमाणे कारवाई केली.:-

(A) "UGC by letter D.O. No.F.2-6/98 (PS) dated 25th December 1998 had pointed out that the decision of the UGC was after obtaining legal opinion in respect of counting of service for Placement benefits in the Senior Scale and Selection Grade is as under:

" The commission after seeking legal openion on caluse 1 (e) has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in senior scale/selection grade, provided as the three conditions, as mentioned hereunder are fulfiled.

(a) The adhoc service was of more than one year duration;

(b) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee; and

(c) The incumbent was Selected to the permanent post in continuation to the adhoc service without any break."

(B) "Even as late as in 2010 the latest UGC Regulations Notified under No.F.3-1/2009 dated 30 th June 2010 dealt with the question of counting of service for placement benefits as under:

**"10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS:**

**10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that**

**(i) The period of service was of more than one year duration**

**(ii) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and**

**(iii) The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc or temporary service without any break**"

This is in line with the Hon ble Supreme Court decision rendered in Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents (AIR 1988, Supreme Court 335) that "**experience is the basis of placement.**"

**(१६)** दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजीच्या शासननिर्णयानुसार काही विद्यापीठात कुलगुरूंचे निदेश (direction) निर्गमित झाले असून बहुतेक विद्यापीठात मा. राज्यपालांच्या संमतीने त्या शासन निर्णयाला परिनियमांचे स्वरूप मिळालेले आहे. या शासन निर्णयाच्या परिच्छेद १२ प्रमाणे या सर्व शिक्षकांची स्थाननिश्चितीनुसार वेतन निश्चिती करण्याची पूर्ण जबाबदारी ही विद्यापीठांवर सोपविण्यात आली आहे. परिच्छेद १२ मधील पुढील मजकूर पहा.:- "Universities shall fix the revised pay of all the teachers and equivalent cadres under their jurisdiction as per this scheme..." कायद्याने दिलेल्या अधिकारानुसार एकदा विद्यापीठांनी आपले हे कर्तव्य पार पाडल्यानंतर त्यामध्ये फेरफार करण्याचा अधिकार औरंगाबादच्या सहसंचालकांना कोणत्या कायद्यान्वये प्राप्त होतो याचाही खुलासा कुठेना कुठे त्यांना करावाच लागेल.

****

## मा. न्यायालयाच्या अवमान याचिका प्रक्रियेचा प्रभाव : २

सन १९९६ नंतर निवडश्रेणीमध्ये गेलेल्या व त्या श्रेणीत पाच वर्षाची सेवा ज्यांनी पूर्ण केलेली आहे, अशा शिक्षकांची **१४९४०** च्या टप्प्यावर वेतननिश्चिती करण्याचा लाभ न देण्याबाबत राज्य शासनाने स्वीकारलेले कमालीच्या आकसाचे धोरण मा. उच्च न्यायालयातील अनेक निर्णयांनी निष्प्रभावी ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांच्या निर्णयांची धोरणात्मक अंमलबजावणी करणारे शासननिर्णय अजूनही काढण्यात आलेले नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** उच्च न्यायालयाच्या इतक्या खंडपीठांनी निर्णय दिल्यानंतर राज्यशासनाने त्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. म्हणून अवमान याचिका दाखल झाल्या. **उच्च शिक्षण सचिवांना उच्च न्यायालयात बिनशर्त क्षमा मागावी लागली.** दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी अपिलासाठी विशेष परवानगी मागणारी याचिका दाखल केली. ती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आली व ती मा. सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केली. **मुळात मा. न्यायालयाच्या निर्णयामुळे व त्यानंतर अवमान याचिकांच्या सपाट्यामुळे जेवढ्या शिक्षकांनी अवमानयाचिका दाखल केल्या तेवढ्यांना तो लाभ मिळाला किंवा त्यांची 'रिकव्हरी' थांबली.** - संपादक

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
## CIVIL APPELLATE JURISDICTION
## WRIT PETITION NO.8256 OF 2013

**(1)** Shivaji University Teachers Association (SUTA) **(2)** Sadale Vasant Ganpati, **(3)** Pawar Mangala Sarjerao, **(4)** Bawne R.R., **(5)** G.A. Patil, **(6)** B.K. Patil, **(7)** M.R. Ghatge, **(8)** S.H. Mahamulkar, **(9)** Dr. G.R. Pathade, **(10)** S.P. Patil, **(11)** Dr. D.T. Patil, **(12)** R.A. Patil, **(13)** Dr. I.S. Kalamade, **(14)** S.S. Misal, **(15)** P.N. Hargude, **(16)** Dr. S.N. Durugkar, **(17)** Dr. V.V. Jadhav, **(18)** S.S. Mane, **(19)** B.T. Pawar. ..**Petitioners. VERSUS (1)** The State of Maharashtra, through its Secretary of Ministry of Higher And Technical Education, Mantralaya, Mumbai-400 032. **(2)** The Director of Education (Higher Education) Maharashtra State, Central Building, Pune 411 001. ...**Respondents.** Mr. C.G. Gavnekar, for Petitioners. Smt. S. S. Bhende, AGP for Respondent Nos. 1 and 2.

**CORAM**
**ANOOP V. MOHTA AND A.S. GADKARI, JJ.**

**Reserved On: 7 October 2014.**
**Pronounced On: 13 October 2014.**

**JUDGMENT (PER A.S. GADKARI, J.):-**

Rule. Rule made returnable forthwith. By consent of the parties, the petition is heard finally at the stage of admission itself.

**2.** Petitioner Nos.2 to 19 are the retired teachers from the various colleges affiliated to the Shivaji and Solapur Universities. Petitioner No.1 is an association of the teachers working in the colleges affiliated to the said universities. Petitioner Nos.2 to 19 retired between 1.1.2006 and before 1.9.2009 from various colleges in the State of Maharashtra. The University Grant Commission changed the qualifying service for retirement benefits from not less than 33 years to 20 years and the amount of pension was required to be calculated at 50% for the pensionable pay. Thus, the qualifying service from 33 years came to be reduced to 20 years in case of University Teachers entitling them for the benefit of full pension from 1.1.2006. That the said revision of qualifying service was pursuant to the 6th Pay Commission. **The Respondent- State of Maharashtra thereafter issued a Government Resolution dated 30.10.2009 thereby making the qualifying service of 20 years for the pensionary benefit only to those employees who had retired after 27.2.2009. As a result, those teachers who have retired after 1.1.2006 and before 1.3.2009 were excluded from receiving full pension on completion of 20 years of the qualifying service. Petitioner Nos.2 to 19 fall in the said category and were not given the enhanced pension.**

**3.** A Writ Petition No.5284 of 2011 was filed by the Association of College and University Superannuated Teachers in the High Court of Bombay, Bench at Aurangabad challenging the Government Resolution dated 21.8.2009 wherein similar issue was involved for fixing a cut off date of 1.9.2009. The Division Bench of this Court by its judgment dated 26.9.2011 was pleased to dismiss the said petition thereby upholding the said Government Resolution dated 21.8.2009. The Petitioners therein thereafter preferred the S.L.P. bearing No.3700 of 2012 wherein a leave came to be granted and the Civil Appeal No.908 of 2013 came to be allowed by the Supreme Court. The Supreme Court while allowing the said Civil Appeal was pleased to set aside the impugned judgment and order dated 26.9.2011 passed by the High Court of Bombay, Bench at Aurangabad. The Supreme Court held that the cut off date i.e. 1.9.2009 specified in the **Government Resolution dated 21.8.2009 is unconstitutional and was further pleased to hold that the employees governed by the Resolution dated 5.5.2009 are entitled to the benefit of enhanced gratuity i.e. Rs.7 lacs.**

**4.** The Petitioners thereafter preferred a Writ Petition bearing No.6369 of 2013 in this Court thereby claiming the benefit of higher amount of gratuity on the basis of judgment and order dated 30.1.2013 passed by the Apex Court in the case of Association of College and University Superannuated Teachers Vs. Union of India & Ors (Civil Appeal No.908 of 2013). The Division Bench of this Court by its judgment and order dated 3.9.2013 disposed of the said petition by passing following order:-

(I) We direct the second respondent to scrutinize the cases of the petitioner nos.2 to 142 for grant of benefit in accordance with the Judgment and Order dated 30th January, 2013 of the Apex Court in Civil Appeal No.908 of 2013;

"(II) We grant time of three months to the second respondent to scrutinize the cases of the aforesaid petitioners. The benefit of the order passed by the Apex Court shall be extended to

### मा. न्यायालयाच्या अवमान याचिका प्रक्रियेचा प्रभाव : ३

१ जानेवारी २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना ५ लक्ष रूपये व काही शिक्षकांना ७ लक्ष रूपये ग्रॅच्युईटी अदा करण्याचा राज्य शासनाचा भेदभाव करणारा शासन निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात ३० जानेवारी २०१३ रोजी रद्द झाला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाच्या आधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६३६९ मध्ये दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी "तसा धोरणात्मक निर्णय चार आठवड्यात निर्गमित करा" असा निर्णय दिला. चार आठवड्याच्या आत शासनाने धोरणात्मक निर्णय तर घेतला नाहीच पण आकसाने पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाची ही पुनर्विलोकन याचिका दिनांक १३.१०.२०१३ रोजी "The review petition is accordingly dismissed." या शब्दात डिसमिस केली. शेवटी संबंधित प्राध्यापकांना मा. सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका (३०७/२०१३) दाखल करावी लागली. याच संदर्भात दिनांक ४ जुलै २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रधान सचिव उच्चशिक्षण यांना बिनशर्त माफी मागावी लागली. **मुळात मा. न्यायालयाच्या निर्णयामुळे व त्यानंतर अवमान याचिकांच्या सपाट्यामुळे आता दिनांक ३१ जूलै २०१४ रोजी धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित झाला.** - संपादक

### मा. न्यायालयाच्या अवमान याचिका प्रक्रियेचा प्रभाव : ४

समाजकार्य महाविद्यालयातील "**शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय**" मंत्रिमंडळाने ८ जुलै १९९८ च्या बैठकीत घेतला होता. राज्यशासनाचा हा निर्णय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारा आहे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाने १८ जानेवारी २००० रोजी रद्द (SET ASIDE) ठरविला होता, तर राज्य मंत्रिमंडळाने पून्हा ११ जुलै २००१ रोजीच्या बैठकीत "**या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला**" हे एक अत्यंत लांछनास्पद असे घटनाबाह्य वर्तन होते. मा. उच्च न्यायालयाने पुन्हा दिनांक १० जून २०१३ रोजी दिलेल्या निर्णयात पुढील प्रमाणे आदेश दिले. :- "The monthly pension due to them from 1.1.2014 shall be released regularly along with others. Any default or delay in payment after stipulated period shall attract interest as per prevailing policy of the State Government." शासनाने लगेच सर्वोच्च न्यायालयात विशेष अपिलाची परवानगी मागण्यासाठी याचिका दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी '**डिसमिस**' केली. तरीही शासननिर्णय निर्गमित निघत नव्हता तेव्हा अवमान याचिका दाखल झाली. **मुळात मा. न्यायालयाच्या निर्णयामुळे व त्यानंतर अवमान याचिकेच्या सपाट्यामुळे आता समाजकार्य महाविद्यालयापुरता शासननिर्णय २९ ऑक्टोबर २०१४ रोजी निर्गमित झाला आहे.** - संपादक

those who are found to be on par with the Members of the Association of College and University Superannuated Teachers, which was the appellant before the Apex Court;

(III) We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today;

(IV) Though we have disposed of the above petition with the aforesaid directions, for reporting compliance, the petition shall be placed on the Daily Board on 14th October, 2013 under the caption of "Directions."

**5.** The Petitioners have filed the present petition praying that by writ of mandamus and/or by appropriate writ, direction and order, **the Respondents be directed to pay Petitioner Nos.2 to 19 difference in enhanced pension payable in terms of Government Decision** No.SEVANIVE/1009/PRAKRA.33/SEVA-4 dated 30.10.2009 by fixing cut off date as 01/01/2009 along with the interest. When the petition came up on earlier occasion for hearing, it was submitted on behalf of the Respondent-State of Maharashtra that they have preferred a Review Petition against the judgment and order of the Supreme Court dated 30.1.2013, and therefore, they sought time for complying with the order passed by this Court in Writ Petition no.6369 of 2013 dated 3.9.2013.

**6** Mr. Gavnekar, the learned Counsel appearing for the Petitioners submitted that the said Review Petition bearing no.1659 of 2013 in Civil Appeal No.908 of 2013 has been dismissed by the Supreme Court by its order dated 23.3.2013. He further submitted that the Petitioners in Writ Petition No.5284 of 2011 in High Court of Bombay, Bench at Aurangabad and the appellants in Civil Appeal No.908 of 2013, initiated contempt proceedings. He further submitted that even the Curative Petition (Civil) No.156 of 2014 taken out by the State of Maharashtra in Review Petition (Civil) No.1659 of 2013 came to be dismissed by the Supreme Court by its order dated 12.8.2014 and therefore there is no other alternative to the Respondents, but to comply with the directions given by the Supreme Court in Civil Appeal No.908 of 2013 and subsequently by the Division Bench of this Court in Writ Petition No.6369 of 2013 by its order dated 3.9.2013.

**7.** The learned AGP on the other hand submitted that during the pendency of the contempt proceedings, the State of Maharashtra has deposited an amount of Rs.32 Crores in the Registry of the High Court of Bombay, Bench at Aurangabad and the same shall be distributed to all the concerned as early as possible.

**8. In view of the said submission, we have no hesitation in allowing the present petition in terms of prayer clause (a) which reads as under:** "(a) that by Writ of Mandamus and/or by appropriate Writ, Direction and Order, Your Lordship be pleased to direct the Respondents to pay the Petitioner Nos.2 to 19 difference in enhanced pension payable in terms of Government Decision No.SEVANIVE/1009/PRAKRA.33/SEVA-4 dated 30.10.2009 by fixing cut off date as 01/01/2009 along with the interest.

**9. In the result, the present petition is allowed in terms of prayer clause (a).** The Respondents are hereby directed to pay to the Petitioners the difference of enhanced pension within a period of 3 months from the date of receipt/production of copy of this order. Rule is made absolute accordingly.

**10.** All the concerned to act on the authenticated copy of this order.

**(A.S. GADKARI, J.)** **(ANOOP V. MOHTA, J.)**

*८० वर्षे व त्यावरील निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनात दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून १० टक्के वाढ करण्याबाबत*

# महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

*शासननिर्णय क्रमांक : सेनिवे - १०१४ / प्र.क्र. २६ / सेवा - ४ : हुतात्मा राजगुरू चौक मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०००३२ : तारीख : ०९ जुन, २०१४*

## शासन निर्णय

शासन असा आदेश देत आहे की, ८० वर्षे व त्यावरील राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या मूळ निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनात दिनांक १.४.२०१४ पासून १० टक्के वाढ करण्यात यावी.

२. या निर्णयामुळे प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या निवृत्तीवेतन वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / कोषागार अधिकारी यांची राहील.

३. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तीधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देते की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये / स्वायत्त संस्थांमध्ये / स्थानिक संस्था, इत्यादींमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्विकारलेली आहे व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : निअंक १०९९ / ३०६ / सेवा - ४, दिनांक १५ नोव्हेंबर, १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : निअंक १०१० / प्र. क्र. ५८ / सेवा - ४, दिनांक २६ जुलै, २०१० अनुसार सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत निवृत्तीवेतनास पात्र ठरले आहेत, अशा ८० वर्षे व त्यावरील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना सुधारित निवृत्तीवेतनावर दिनांक १.४.२०१४ पासून १० टक्के वाढ अनुज्ञेय राहील.

६. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या 'निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने' ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१४०६०९१४४४२९४६०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही

(स. ह. भोसले) शासनाचे अवर सचिव

** AF : P305 **

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.11.2014**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

-----------------------------------------------

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................